७० वर्ष
दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## ६ मार्चला अर्थसंकल्प; फडणवीसांच्या भूमिकेकडे सर्वांचेच लक्ष

मुंबई (दै. संध्या) : यंदा राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सादर करण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेत झालेल्या अकाली निधनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हा निर्णय घ्यावा लागण्याची शक्यता आहे. राज्याच्या राजकारणात ही एक अत्यंत दुर्दैवी आणि अनपेक्षित घडामोड ठरली असून, तिचा थेट परिणाम अर्थसंकल्पीय प्रक्रियेवरही झाल्याचे दिसून येत आहे. 23 फेब्रुवारीपासून राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार असून, 6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर अर्थ खात्याची जबाबदारी नेमकी कोणाकडे दिली जाणार, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र सध्याची परिस्थिती पाहता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः ही जबाबदारी स्वीकारून अर्थसंकल्प मांडतील, अशी शक्यता अधिक वर्तवली जात आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

### राज्य सरकारची खर्चावर कात्री

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्र सरकारने प्रशासनावर वाढत चाललेल्या आर्थिक भाराला आळा घालण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आर्थिक शिस्त अधिक काटेकोरपणे पाळण्यासाठी 2025-26 या आर्थिक वर्षातील बजेटमधील निधी वितरणावर मर्यादा आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासंदर्भात शासनाकडून परिपत्रक जारी करण्यात आले असून, विविध विभागांना खर्चाबाबत विशेष दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. दरवर्षी अर्थसंकल्पात मंजूर केलेला संपूर्ण निधी प्रत्यक्ष खर्च होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने आधीच नियोजन करून खर्च कमी करण्याचा मार्ग स्वीकारल्याचे स्पष्ट झाले आहे.

### राजकीय प्रचाराला हिंसक वळण

रायगड (दै. संध्या) : रायगड जिल्ह्यातील नेरळ परिसरात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारादरम्यान झालेल्या वादातून एका तरुणावर जीवघेणा चाकू हल्ला करण्यात आला. ही घटना इतकी गंभीर होती की, हल्ल्यातील तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या नेरळ येथील रायगड हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. निवडणूक काळातच अशा प्रकारच्या हिंसाचारामुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही घटना मध्यरात्री सुमारे दीडच्या सुमारास घडली. विशेष म्हणजे ही घटना नेरळ पोलिस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर घडल्याने पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. शिंदे शिवसेनेचे नेते व माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश टोकरे यांच्या पत्नी सुनीता टोकरे यांच्या निवडणूक प्रचारादरम्यान काही कार्यकर्त्यांमध्ये वाद निर्माण झाला होता. सुरुवातीला शाब्दिक चकमक असलेला हा वाद काही वेळातच हिंसक स्वरूपात बदलला आणि त्यातून चाकूहल्ल्याची घटना घडली.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी आमदारांची आज बैठक : सारे जुळून आल्यास आजच निर्णय; उपमुख्यमंत्री पदाबाबत छगन भुजबळांचे वक्तव्य

# उपमुख्यमंत्री पदाबाबत आजच शपथविधी

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची उद्या बैठक होईल. त्यात विधिमंडळ पक्षनेतेपदाची आणि उपमुख्यमंत्रीपदाच्या नावाची निवड केली जाईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी दिली. छगन भुजबळ, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे या नेत्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. तसेच अजित पवारांची खाती आणि इतर मुद्यांवर चर्चा झाली.

छगन भुजबळ माध्यमांशी बोलताना म्हणाले की, उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची चर्चा होत आहे. त्यांना उपमुख्यमंत्री करावे, अशी मागणी होत आहे. उद्या आमदाराची बैठक बोलावली आहे. सारे जुळून आल्यास आजच शपथविधी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली



असतानाच उपमुख्यमंत्री पदावरून चर्चा सुरू झाली आहे. अनेकांचे म्हणणे आहे की सुनेत्रा पवार यांची निवड अजित पवारांच्या पदावर करण्यात यावी. त्यानुसार राजकीय वर्तुळात हालचाली देखील सुरू असल्याचे दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर तटकरे यांनीही पत्रकारांशी संवाद साधला असून, उपमुख्यमंत्री पदाबाबत धार्मिक विधी झाल्यानंतर निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. सुनील तटकरे म्हणाले, दादांच्या अकाली जाण्याच्या धक्क्यातून आम्ही कोणीही सावरलो नाहीये. आम्हाला अजूनही असे वाटते की दादा आमच्यातच आहेत. या शोकमग्न अवस्थेतच आम्ही आहोत. आज अजितदादांच्या अनुपस्थितीत कार्यालयात येणे हे माझ्यासाठी क्लेशकारक आहे. या कार्यालयात त्यांनी पक्षाचे संघटन उभे केले, इथे त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे यासाठी मी कार्यालयात आलो. याच भावनेने मी आलो होतो. पुढे बोलताना सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. भुजबळ यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेविषयी विचारले असता, त्यांनी याबाबत मला फारसे काही माहित नसल्याचे स्पष्ट केले आहे. छगन भुजबळ म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की नाही याबाबत मला फारसे माहित नाही. पण आता सध्या ही राष्ट्रवादी जी आहे अजित पवारांची, यात जे काही कामे आहेत, त्याकडे आपण लक्ष देत आहोत. उपमुख्यमंत्री पद रिकामे आहे, ते पद सुनेत्रा ताईंच्या माध्यमातून कसे भरता येईल त्यावर आमचे जास्त लक्ष आहे. बाकीचे पुढे बघता येईल. लोक जसे ठरवतील त्यानुसार निर्णय घेता येईल. उद्याच्या बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर, उद्याच्या उद्या शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान भुजबळ यांनी केले आहे.

### शो मस्ट गो ऑन- छगन भुजबळ

यासंदर्भात छगन भुजबळ यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अजित पवार गेले आणि ज्या पद्धतीने गेले आहेत, त्यामुळे झोप उडाल्यासारखी झाली आहे. पण आता असे आहे की शेवटी 'शो मस्ट गो ऑन' असे म्हणतात, त्यामुळे कोणावर तरी जबाबदारी देऊन हे चालवले पाहिजे, पक्ष असेल सरकार असेल. उद्या मला असे वाटते की जे विधानमंडळातले जे नेते आहेत आमचे, त्यांची बैठक बोलावली आहे. त्यात पक्षाचे प्रमुख पद जे अजितदादांकडे होते, ते देण्याच्या संदर्भात निर्णय होईल.

## अजित पवारांच्या नावावर राजकारण अमानुष : संजय राऊत

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून राज्य अद्याप सावरलेले नसताना त्यांच्या नावावर सुरू असलेल्या राजकारणावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



शुक्रवारी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या नावावर राजकारण करणे अतिशय अमानुष आहे आणि अशा विषयांवर आपण बोलणार नाही. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व राजकीय नेत्यांना संयम बाळगण्याचे आवाहन करत सध्याच्या दुःखद परिस्थितीत राजकीय चर्चा टाळण्याची गरज असल्याचे नमूद केले. संजय राऊत म्हणाले की, अजित पवार यांच्या पार्थिवावर नुकतेच अंत्यसंस्कार करण्यात आले असून, महाराष्ट्र अजूनही त्यांच्या जाण्याच्या दुःखातून सावरलेला नाही. अशा परिस्थितीत कोणी त्यांच्या नावावर राजकीय डावपेच खेळत असेल, तर ते अत्यंत चुकीचे आहे. तळागाळातील कार्यकर्तेसुद्धा रडत होते. अशा वेळी किमान 15 ते 20 दिवस तरी राजकीय चर्चा नको. त्यांच्या पक्षातील अंतर्गत विषयांवर किंवा त्यांच्या कुटुंबातील निर्णयांवर बोलणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# “बारामतीचा वाघ अजूनही समर्थ आहे!”

अजितदादांनंतर शरद पवार पुन्हा मैदानात; नेतृत्व वादाच्या चर्चेत साहेबांचा ‘सायलेंट’ मास्टरस्ट्रोक

बारामती (दै. संध्या)

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती व येथे राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाची भावना ही पोरकेपणाची झाली होती. परंतु, आज अजित पवारांच्या अस्थि विसर्जनानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार हे स्वतः बारामतीमध्ये सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज बारामती येथे शरद पवारांकडून नीरा नदीची पाहणी करण्यात आली.

अजित पवारांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. विशेषतः बारामतीमध्ये सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अजित पवारांनी



बारामतीचा कायापालट केला आहे, आता अजितदादानंतर बारामतीकडे कोण बघणार, इथल्या लोकांच्या समस्या कोण बघणार, असा प्रश्न बारामतीकरांना पडला होता. परंतु, अजित पवारांच्यानंतर आता शरद पवार बारामतीमध्ये सक्रिय झाले आहेत. त्यांनी येथील नीरा नदीची पाहणी केली आहे.

नीरा नदीबद्दल सातत्याने चर्चा होती की नीरा नदी प्रदूषित झाली आहे. आता त्याची पाहणी करून यासंदर्भात शरद पवारांनी माहिती घेतली आहे. अजितदादांच्या निधनाने शरद पवार खचल्याचे पाहायला मिळाले होते. मात्र, आज शरद पवारांनी पुन्हा कामाला सुरुवात करत बारामतीकरांना विश्वास धीर देण्यासाठी सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे.

शरद पवार जेव्हा नीरा नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचले तेव्हा येथील स्थानिकांनी कार्यकर्त्यांनी येथील तक्रारी व समस्या मांडल्या. नदीचे पाणी क्षारयुक्त झाले असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या दूषित पाण्यामुळे शेतीवर परिणाम होत असून जमिनी सुद्धा क्षारपट झाल्याचे येथील स्थानिकांनी सांगितले आहे. तसेच नीरा नदीत कारखान्याचे दूषित पाणी सोडल्याने नदीचे पाणी खराब झाले आहे.

# दादा तुम्हाला घट्ट मिठी मारायचीय : रोहित पवार

मुंबई (दै. संध्या)

'अजितदादांच्या निधनाची दुर्दैवी बातमी आल्यापासून डोकं सुन्न आहे. मन बर्फाप्रमाणे थिजलंय. अजितदादांनी जिथं विकासरूपी फुलांची बाग फुलवली, तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं,' अशी भावनिक प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूनंतर पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाय.

अजित पवारांच्या निधनानंतर आज त्यांची राख सावडण्याचा विधी सकाळी बारामती येथील विद्याप्रतिष्ठानमध्ये झाला. यावेळी पार्थ पवार, जय पवार, श्रीनिवास पवार, रोहित पवार आणि पवार कुटुंबातील इतर सदस्यांची उपस्थिती होती. या



विधीनंतर रोहित पवारांनी सोशल मीडियात एक पोस्ट करून आपल्या भावनांना वाट मोकळी करू दिली.

रोहित पवार आपल्या ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हणतात, 'मा. अजितदादांनी जिथं विकासरूपी फुलांची बाग फुलवली तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं कधी स्वप्नातही आलं नाही.. पण नियतीच्या क्रूर खेळापुढं कुणाचं काही चालत नाही.. अजितदादांची ती दुर्दैवी बातमी आल्यापासून अद्यापपर्यंत डोकं सुन्न आहे... मन बर्फाप्रमाणे थिजलंय.. काय झालं, कसं झालं आणि का झालं, या विचाराचं मनातलं काहूर थांबत नाही.

आपल्यात आत्तापर्यंत जे-जे काही संभाषण झालं, चर्चा झाल्या, विशेषतः शेवटच्या काही दिवसांमध्ये झालेल्या भावनिक चर्चा, हे सगळं काही एखादा टेपरेकॉर्डप्रमाणे सारखं सारखं कानात घुमतंय. जणू काही तुम्हीच अदृश्य स्वरूपात बोलत आहात असा भास होतोय. तुमची ती काम करण्याची शैली, प्रशासनावर पक्की पकड, राजकारणावर मजबूत कमांड, परखड स्वभाव, हो ला हो आणि नाही ला नाही न करता जे असेल ते स्पष्ट सांगून समोरच्या व्यक्तीसोबत राजकारण न खेळण्याची पद्धत, कामाचा झपाटा, वेळेचं काटेकोर नियोजन या सगळ्याचं आम्हाला अक्षरशः कौतुक आणि आश्चर्यही वाटायचं.

## अजित पवार राष्ट्रवादी एकीकरणासाठी सकारात्मक होते : जयंत पाटील

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाबाबत पुन्हा एकदा मोठी चर्चा सुरू झाली असून, शरद पवार गटातील ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी यासंदर्भात महत्त्वाचे विधान केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट एकत्र यावेत, हीच आपली सुरुवातीपासूनची भूमिका होती, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. अजित पवार यांच्या निधनानंतर प्रथमच एकीकरणाच्या मुद्द्यावर इतक्या ठाम शब्दांत प्रतिक्रिया देण्यात आल्याने, राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. जयंत पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतरही दोन्ही गट पुन्हा एकत्र यावेत, असा त्यांचा प्रयत्न सातत्याने



सुरू होता. या भूमिकेतूनच त्यांनी आणि दुसऱ्या गटातील प्रमुख नेत्यांनी अनेक वेळा बैठका घेतल्या. या बैठका केवळ औपचारिक नव्हत्या, तर त्यामध्ये भविष्यातील राजकीय वाटचाल, निवडणुकांची रणनीती आणि पक्ष एकत्र आणण्याच्या शक्यतांवर सविस्तर चर्चा झाली होती, असेही त्यांनी नमूद केले.

# ‘राष्ट्रवादी'त पुढे काय? : राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवारांसह प्रफुल्ल पटेलांचे नाव चर्चेत

### पार्थ पवार राज्यसभेवर जाण्याची शक्यता

मुंबई (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीमध्ये भीषण अपघातानंतर झालेल्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी हा धक्का अधिक गंभीर मानला जात आहे. अजित पवार हे केवळ उपमुख्यमंत्रीच नव्हते, तर पक्षातील सर्वांत प्रभावी नेतृत्व मानले जात होते. त्यांच्या जाण्याने पक्षाच्या नेतृत्वाबरोबरच महायुती सरकारमधील महत्त्वाच्या सत्ताकेंद्रांवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणि महायुतीत दोन्हीकडेच पुढील दिशा काय असणार, याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

अजित पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासोबत अर्थ खाते, उत्पादन शुल्क आणि क्रीडा खात्याची जबाबदारी होती. ही खाती राज्याच्या कारभाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे आता ही खाती कोणाकडे सोपवायची, हा प्रश्न सरकारपुढे उभा राहिला आहे. दुसरीकडे, अजित



पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्वही प्रभावीपणे सांभाळत होते. त्यांच्या अकाली जाण्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाची धुरा कोण सांभाळणार, यावरही राष्ट्रवादीतील नेत्यांमध्ये मंथन सुरू झाले आहे.

या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या विलिनीकरणाची चर्चा जोर धरत असतानाच एक वेगळाच प्रस्ताव पुढे आला आहे. अजित पवार यांच्या गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व स्वतंत्रच ठेवावे, अशी भूमिका पक्षातील अनेक नेते मांडत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकीकरणाऐवजी स्वतंत्र वाटचाल करण्याचा पर्याय पुढे येत असल्याचे चित्र आहे. अजित पवार हयात असताना सुरू असलेल्या विलिनीकरणाच्या चर्चांवर आता पूर्णविराम लागणार की नाही, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाबाबतही महत्त्वाचा प्रस्ताव चर्चेत आहे. सध्या कार्याध्यक्ष असलेले प्रफुल पटेल यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात यावी, असा सूर पक्षातील नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे. प्रफुल पटेल हे अनुभवी नेते असून राष्ट्रीय पातळीवर त्यांचा मोठा राजकीय अनुभव आहे. त्यामुळे पक्षाची धुरा त्यांच्याकडे सोपवावी, असा प्रवाह राष्ट्रवादीमध्ये तयार होत असल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे पक्षातील सर्वात मोठे पद म्हणजे राष्ट्रीय अध्यक्षपद. हे पद अजित पवारांकडे होते. त्यामुळे आताही हे पद पवारांच्या घरातच रहावे. सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष व्हाव्यात, अशी मागणी पक्षातील नेत्यांमधून होत असल्याचे समजते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार, याची उत्सुकता आहे.

उपमुख्यमंत्रीपदासाठीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हालचाली वेगाने सुरू आहेत. अजित पवार यांच्या पश्चात हे पद सुनेत्रा पवार यांनाच देण्यात यावे, असा प्रस्ताव राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून पुढे आला आहे. याबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आज वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यासाठी पाहोचले. छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे नेते वर्षा निवासस्थानी पोहोचले असून, उपमुख्यमंत्रीपदावर सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

## संपादकीय

यूजीसी कायदा विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकताच लागू केला असला तरी आंदोलनकर्त्यांनी रोष केंद्र सरकारवर ठेवला होता. खुल्या वर्गातील विद्यार्थी या आंदोलनात उतरल्यामुळे नेमके या कायद्यात काय आहे; विरोध का होत आहे, याबद्दल सर्वसामान्य नागरिकांना उत्सुकता निर्माण झाली. यूजीसी कायद्यातील नवीन नियम लागू करण्याच्या निर्णयाला विरोध करत, उत्तर प्रदेशसह काही राज्यात तरुण रस्त्यांवर उतरले. विद्यापीठ निगडित हा कायदा जानेवारी महिन्यातच देशभर लागू झाला असला तर त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटले नसले तरीही, आंदोलनाचे लोळ कधीही आपल्यापर्यंत पोहोचू शकतात,

# केंद्र सरकारवर खापर का?

अशी स्थिती निर्माण झाली होती. खरे तर हा कायदा विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकताच लागू केला असला तरी आंदोलनकर्त्यांनी रोष केंद्र सरकारवर ठेवला होता. खुल्या वर्गातील विद्यार्थी या आंदोलनात उतरल्यामुळे नेमके या कायद्यात काय आहे; विरोध का होत आहे, याबद्दल सर्वसामान्य नागरिकांना उत्सुकता निर्माण झाली. विद्यापीठ परिसर, महाविद्यालयाच्या आवारापुरता मर्यादित असणाऱ्या यूजीसी कायद्यातील नियमाचा विरोध करण्यासाठी विद्यार्थी नव्हे तर पालकसंघटना, उच्चवर्णीय समाजातील नेते मंडळींनी मोर्चे काढले. ९०च्या दशकात मंडल आयोगाच्या शिफारसीवरून उच्चवर्गीय, ओबीसी समाजात निर्माण झालेल्या वादाची पुनर्रावृत्ती होते का, असे वातावरण निर्माण झाले होते. दुसऱ्या बाजूला दलित विद्यार्थी संघटनांकडून या नव्या नियमांची अंमलबजावणी व्हावी यासाठी रस्त्यावर उतरून दबाव गट करण्यात येत होता. त्यामुळे, दोन्ही बाजूने केंद्र सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला. यूजीसी कायद्याच्या नव्या नियमांना आव्हान देणारे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांनी या नियमांना आव्हान देताना जो युक्तिवाद केला,' त्यात ते मनमानी, भेदभाव करणारे आणि संविधान आणि विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६चे उल्लंघन करणारे आहेत,' असे मुद्दे मांडण्यात आले. प्रथमदर्शनी हे मुद्दे खंडपीठाला पटले. 'नवीन नियम अस्पष्ट आहेत आणि नवीन यूजीसी नियमांचा गैरवापर होऊ शकतो', अशी कडक टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. त्यानंतर पुढील आदेशापर्यंत नवीन यूजीसी नियमांना स्थगिती देण्याचा निर्णय खंडपीठाने घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे, एका अर्थाने चांगले झाले, कारण रस्त्यावरील आंदोलनाची धग शांत होणार आहे. यूजीसीतील नवीन नियम काय आणि त्यातून खरेच खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय होणार होता का हे तटस्थपणे पाहण्याची गरज आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, दिव्यांग आणि महिलांच्या संरक्षणार्थ विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एक नवा नियम जारी केला. या वर्गांच्या संरक्षणासाठी प्रत्येक विद्यापीठात आणि महाविद्यालयात एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. शैक्षणिक परिसरात समानतेचा पुरस्कार करणे हे महाविद्यालय, संबंधित संस्थांना बंधनकारक असणार आहे, असा हा नवीन नियम सांगतो. जाती आधारित भेदभावाच्या तक्रारी वाढल्याच्या तक्रारी सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्यानंतर, त्यावर नवीन नियम करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने या पूर्वीच्या आदेशात दिले होते. यूजीसीने केंद्र सरकारच्या संसदीय समितीकडे एक अहवाल सादर केला होता. या समितीत काँग्रेस, भाजपसह सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे खासदार होते. तो अहवाल पुन्हा दोन वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला. त्या अहवालातील आकडेवारीनुसार, देशभरातील विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये जाती आधारित भेदभावाच्या तक्रारींमध्ये गेल्या ५ वर्षांत ११८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे यूजीसीने कायद्यातील नवीन नियमांमध्ये, ओबीसी, महिला आणि दिव्यांग या वर्गाचा अंतर्भाव केला गेला. नव्या नियमातील या तरतुदींना खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा विरोध आहे. या नियमाचा गैरवापर झाला तर त्यावर काय करायचे याची कोणतीही तरतूद नसल्याचा आरोप केला गेला.

## संस्कृत सुभाषित

अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन् लभते
बुद्ध्यवज्ञानमवानं च भारत ॥
(उद्योगपर्व, अध्याय ३९, २ महाभारत)

अर्थ : समयाला न शोभणारे भाषण करणारा बृहस्पती जरी असला तरी त्याचा तिरस्कार होतो व तो सुद्धा अपमानाला पात्र होतो.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, "कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?" तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

"अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे" कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, "त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!"

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असमे!

## उपदेशकथा

### वर्डस्वर्थची कविता

स्वामी विवेकानंदाचे नाव लहानपणी होते नरेंद्र. नरेंद्र ज्या महाविद्यालयात जात होता त्या 'जनरल असेंब्ली कॉलेज'चे प्राचार्य होते विल्यम हेस्टी. नरेंद्राविषयी त्यांना अभिमान होता. एकदा ते वर्गात विल्यम वर्डस्वर्थची 'एक्स्कर्शन' ही सुप्रसिद्ध कविता शिकवीत होते. तीत 'एक्स्टसी' असा एक शब्द आहे. समाधीसारख्या या स्थितीत मनाची कोणती आणि कशी अवस्था असते हे ते रंगून जाऊन वर्णन करीत होते. ईश्वराप्रत जाऊन पोहोचलेल्या माणसाला ही अवस्था प्राप्त होते असे त्यांनी सांगितले. 'ईश्वर' शब्द ऐकल्यावर नरेंद्र उभा राहिला आणि त्याने विचारले, 'सर, आपण ईश्वराप्रत पोहोचलेले आहात का? आपण ईश्वर पाहिला आहे का?' प्रा. हेस्टी म्हणाले, 'नाही रे मित्रा, मी देव पाहिलेला नाही पण तुला याविषयीची खरोखरच आवड आणि कळकळ असेल तर तू दक्षिणेश्वराला जा. तेथील कालीमातेचा पुजारी रामकृष्ण परमहंस नावाचा आहे. त्याला अशी वारंवार समाधी लागते आणि त्याने देव पाहिला आहे असे म्हणतात.' नरेंद्राने यापूर्वी केव्हातरी रामकृष्ण परमहंसांचे नाव ऐकले होते पण प्राचार्यांनी त्यांचा उल्लेख केल्यावर त्याची रामकृष्णांच्या भेटीची इच्छा अधिकच तीव्र झाली.

कथा उपदेश : आपल्या ध्येयाबद्दल आवड आणि कळकळ असेल तर तेथे पोचण्यासाठी मार्ग मिळतोच.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:तैतिल ०८:२५:४८ |
| ३१ जानेवारी २०२५ | करण:गर १९:०७:२७ |
| शनिवार | करण:वणिज |
| विक्रम संवत्– २०८२ | २९:५२:५०+ |
| माघ शके संवत्– १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:कर्क२०:००:५० |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– माघ | मुस्लिम मास – शाबान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – ११ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:त्रयोदशी ०८:२५:४८ | श्री विश्वकर्मा जयंती |
| तिथि:चतुर्दशी | राऊळ महाराज पुण्यतिथी |
| २९:५२:५०+ | बालाजी देवस्थान |
| नक्षत्र:पुनर्वसु | घोडायात्रा – चिमूर |
| २५:३३:४७+ | (चंद्रपूर) |
| योग:विष्कुम्भ १३:३२:५५ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | | 9 | | 8 | 2 | |
| 1 | | | | | | | 5 | 9 |
| | 5 | | 3 | | | | 7 | |
| | 1 | | 2 | | 6 | | | |
| 4 | | | 9 | 5 | 3 | | | 8 |
| | | | 4 | | 7 | | 3 | |
| | 4 | | | | 2 | | 8 | |
| 3 | 7 | | | | | | | 5 |
| | 9 | 8 | | 7 | | | 6 | 3 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 7 | 9 | 1 | 3 | 2 | 6 | 4 |
| 6 | 3 | 1 | 8 | 2 | 4 | 9 | 7 | 5 |
| 9 | 4 | 2 | 6 | 7 | 5 | 3 | 8 | 1 |
| 3 | 2 | 8 | 4 | 9 | 1 | 7 | 5 | 6 |
| 1 | 7 | 5 | 3 | 6 | 2 | 8 | 4 | 9 |
| 4 | 6 | 9 | 7 | 5 | 8 | 1 | 3 | 2 |
| 2 | 9 | 6 | 5 | 8 | 7 | 4 | 1 | 3 |
| 5 | 8 | 3 | 1 | 4 | 9 | 6 | 2 | 7 |
| 7 | 1 | 4 | 2 | 3 | 6 | 5 | 9 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५०४ – फ्रांसने नेपल्स अरागोनच्या राज्याला दिले.
- १८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – रॉबर्ट ई. ली दक्षिणेच्या सरसेनापतीपदी.
- १८७६ – अमेरिकेने स्थानिक रहिवाश्यांना आरक्षित जमीनींवर स्थलांतर करण्यास भाग पाडणारी हुकुम काढला.
- १९१५ – पहिले महायुद्ध – जर्मनीने रशियाच्या सैन्याविरुद्ध विषारी वायुचा उपयोग केला.
- १९२९ – सोवियेत संघाने लिओन ट्रोटस्कीला हद्दपार केले.

### राष्ट्रीय

- २००७ – टाटाने ॲंग्लो–डच पोलाद कंपनी कोरस ग्रुप ११ अब्जापेक्षा अधिक बोलीत खरेदी केला.
- २००८ – माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जगभरातील सर्वो त्कृष्ट १०० कंपन्यांमध्ये २९ भारतीय कंपन्यांचा समावेश करण्यात आला.

### जन्म

- १३३८ – चार्ल्स पाचवा, फ्रांसचा राजा यांचा जन्म.
- १५१२ – हेन्री, पोर्तुगालचा राजा यांचा जन्म.
- १९३८ – बियाट्रिक्स, नेदरलँडची राणींचा जन्म.
- १९७५ – प्रिती झिंटा, हिंदी चित्रपट अभिनेत्रींचा जन्म.

### निधन

- १३९८ – सुको, जपानी सम्राट यांचे निधन.
- १४३५ – सुवांदे, चीनी सम्राट यांचे निधन.
- १५८० – हेन्री, पोर्तुगालचा राजा यांचे निधन.
- १७८८ – चार्ल्स एडवर्ड स्टुआर्ट, इंग्लंडचा स्वयंघोषित राजा यांचे निधन.
- १८१५ – होजे फेलिक्स रिबास, व्हेनेझुएलाचा स्वातंत्र्यसैनिक यांचे निधन.
- २००६ – कोरेटा स्कॉट किंग, मार्टिन ल्युथर किंगची पत्नीचे निधन.

### : SMS :

Y is industrial grwth so slow in TAMILNADU & KERALA? Becoz 86% of the work time is spent on lifting, folding & holding.. The Lungi..:) Have a laughing day..

### हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.२ | १७.८ |
| अहमदनगर | २७.२ | १७.५ |
| अकोला | २९.३ | १७.४ |
| अमरावती | २८.८ | १७.५ |
| बीड | ३०.३ | २० |
| भंडारा | २९.३ | १६.८ |
| बुलढाणा | १८.२ | ८.९ |
| चंद्रपूर | ३०.३ | २०.१ |
| चेन्नई | २९.५ | १९.९ |
| नवी दिल्ली | १८.३ | ९.९ |
| धुळे | २७.९ | १६.९ |
| गोंदिया | २८.६ | १६.३ |
| जळगाव | २८.३ | १५.९ |
| कोल्हापूर | २८.९ | १८.८ |
| लातूर | २८.३ | १९.६ |
| मुंबई | ३०.५ | २२.४ |
| नागपूर | २८.४ | १६.१ |
| नांदेड | २९.४ | १८.८ |
| नंदूरबार | २५.९ | १७.४ |
| नाशिक | २८.१ | १६.६ |
| पुणे | २७.५ | १८ |
| पंढरपूर | २९.४ | २१.७ |
| सातारा | २८.६ | १७.३ |
| सांगली | २९.४ | १९.६ |
| सोलापूर | २९.६ | २३.२ |
| वर्धा | २९.६ | १७.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण विवाहविषयक बैठका शक्यतो पुढे ढकला व अंतिम निर्णय घेण्याची घाई करू नका.

**तुळ :** शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पश्चिम प्रवासाचे योग येतील परंतु पूर्वनियोजित प्रवास असेल तरच करा.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम कुटुंबात जुने विचार आणि नवे विचार यामुळे वादविवाद होणे शक्य. एकाने घेतलेली माघार वादळ शांत करेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व हाताखालील लोकांवर टाकलेला जास्तीचा विश्वास तापदायक ठरणे शक्य. आरोग्याचे प्रश्न सुटतील.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम बहीण–भावंडाच्या प्रश्नात मध्यस्थी करावी लागेल. जबाबदारी अंगावर येणे शक्य.

**धनु :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व युवकांनी सट्टा, लॉटरी, शेअर्स इ. झटपट पैशाच्या मागे लागू नका. कुसंगतीपासून दूर राहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. कोणाचे खोटे वागणे मन:स्तापदायक ठरेल.

**मकर :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :पूर्व नोकरीत कामाचे वाढते प्रमाण, वरिष्ठांची अरेरावी यामुळे आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता.


**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व बेकारांना नोकरी त्याच्यात असणाऱ्या पात्रतेमुळे मिळणे शक्य. आर्थिक प्राप्ती मनासारखी राहील.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: दक्षिण उद्योगधंद्यातील महत्त्वाचे निर्णय शक्यतो पुढे ढकला. युवकांनी वाहनांशी मस्ती करू नये.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व संततीचे म्हणणे विचारात घ्या. त्यांचे प्रश्न दुर्लक्षित करू नका. वाहने चालविताना अतिरेक टाळा.

**मीन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम घरगुती प्रश्न घरातच मिटविण्याचा प्रयत्न करा. नाही तर त्याचा परिणाम नोकरीवर होणे शक्य.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४६



### आडवे शब्द

१. नष्ट होणारे
३. पृथ्वी
५. लाचलुचपतीची कमाई
९. द्यूतात नशीब बदलणारा
१०. मर्कट
१२. घाण, धूळकट थर
१३. प्रतिष्ठित
१६. साका, कचरा
१८. ठार मारणे (वा.प्र.)
२४. पौर्णिमा
२५. दान दिल्याचा कागद
२७. नौदल
२८. रमापती
३०. डोंगराचे उभे टोक
३१. आई
३२. मारल्याची खूण
३३. जीभ
३४. खर्चाची दुसरी बाजू
३६. आवाज, छंद
३७. कृष्णसखी
३८. होम, यज्ञ
३९. कमलनयन
४०. शाब्दिक हजामत
४२. परंतु
४३. खोकला
४५. तुझे
४६. जपानी चलन
४७. जाणे–येणे, वहीवाट
४८. मनसोक्त
५०. मोठी बहीण
५२. सेवक
५३. वन्य पशू
५५. श्रीयुत
५७. होकाराच्या विरुद्ध
५९. मुरली
६०. धमकी
६१. निकट, जवळ
६३. तह, तहाचा मसुदा
६४. मर्यादा
६५. राजा, सम्राट
६६. व्यवस्था, कामाची व्यवस्था

### उभे शब्द

१. अत्यल्प
२. नमनीय
३. व्रत
४. मुंबईकरांचा घरगडी
५. विहीर
६. खास पुणेरी चटकदार पदार्थ
७. राष्ट्रीय फूल
८. बूड
११. शंकराला प्रिय असणारे फळ
१४. नरक
१५. उगीच
१६. गीत
१७. चीजवस्तू
१९. जाड सतरंजी
२०. अत्यंत घाबरणे (वा. प्र.)
२१. जहर
२२. वार्ताहरांबरोबर बैठक
२३. पाठ्यपुस्तकातील गीत
२६. धावण्याबरोबर पळण्याचा शब्द
२७. करून सवरून वेगळे राहणे
२९. फळातील द्रव
३२. चेहरा, मुख
३४. एक बारीक धान्य
३५. इंद्रिय
३६. अंगण वाकडे म्हणणाऱ्यांची खरी स्थिती
३७. रक्षा
३८. आग्रही स्वभाव
४१. प्रवासातील टप्पा
४३. कर्णेंद्रिय
४४. समूह, जमाव
४५. पाण्यावरील तेलाचा थर
४८. रम्य
४९. ढीग
५०. टवटवी, ताजेपणा (हिंदी)
५१. मंत्रीमंडळ
५३. अरण्य
५४. सिंह
५५. चामखीळ
५६. एकरूप
५८. सुंदर युवती
५९. छोटा, लहान
६०. औषध
६२. अंधार
६३. मडके
६४. चबुतरा, कट्टा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.दुर्जन ४.सामदाम दंडभेद १०.जवळजवळ ११.गट १२.सारा १३.डबर १५.काका १६.लगाम १७.गरम १९.माळकरी २०.सारंग २१.नवरस २४.सरा २५.याग २६.नरम गरम २८.अनाथाश्रम २९.बकबक ३१.नाद ३२.जगन्नाथ ३३.कली ३४.ताई ३५.साल ३६.भकास ३८.कानशील ४०.बादल ४२.राम ४३.कळप ४४.अवसान ४६.शाल ४७.डबल ४९.लवाद ५१.तरस ५३.चोर ५४.चाकर ५६.यान ५९.उपकार ६०.लवाजमा ६३.वतनवाडी ६६.मालदार ६७.लस ६९.महाकाय ७१.साहस ७२.महासागर ७३.चरखा ७४.वरवर

उभे उत्तर : १.दुपेड २.नजर ३.खळबळजनक ४.सावकारी ५.मळका ६.मजलदरमजल ७.डगमग ८.भेट ९.आराम हराम १२.सार १४.बजरंगबली २०.साया २१.नगद २२.वर २३.अनाथ २४.सश्रम कारावास २७.मनाई २८.अन्नान्नदशा ३०.बस्तान ३३.कलकलाट ३४.ताल ३५.सालोसाल ३७.सम ३८.कापडचोपड ३९.शीतल ४१.ललत ४४.अनाकलनीय ४५.नवा ४८.बरका ५०.दया ५२.रतन ५५.रवा ५७.नवरदेव ५८.ताडी ६१.जमादार ६२.माल ६४.वार्ताहर ६५.तलम ६८.सहा ६९.मग ७०.हार ७१.साव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्याचे माजी महापौर शांतीलाल सुरतवाला यांचे निधन

पुणे (दैनिक संध्या) : पुण्याचे माजी महापौर आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल सुरतवाला यांचे आज पहाटे निधन झाले. त्यांच्या जाण्याने पुण्याच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या महापौरपदाच्या कार्यकाळात त्यांनी शहराच्या विकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण संकल्पना राबवल्या होत्या. शांतीलाल सुरतवाला यांची ओळख केवळ एक राजकारणी म्हणून नव्हती, तर ते एक निष्ठावान कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही लोकप्रिय होते. राजकीय वारसा: शरद पवार आणि सुरेश कलमाडी यांचे निकटवर्तीय म्हणून ते ओळखले जात.

सामाजिक कार्य: 'आनंद ऋषीजी ब्लड बँक'चे ते संस्थापक होते.

कार्यकर्ता ते महापौर: गणेश मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते, माजी नगरसेवक आणि अभिनव कल्पकतेने काम करणारे महापौर म्हणून त्यांनी ठसा उमटवला.

### ग्रंथभेट योजनेसाठी प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : राज्य शासन आणि राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकाता यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी 'ग्रंथभेट' योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिद्ध होणाऱ्या शासनमान्य ग्रंथ निवड यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी सन २०२५ मध्ये प्रकाशित ग्रंथ २८ फेब्रुवारी पर्यंत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई- ४००००१ यांच्याकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात. या योजनेत ग्रंथांची निवड करण्यासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ मध्ये प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामूल्य प्रत सादर करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी यापूर्वी संचालनालयास ग्रंथ पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. मुद्रकाने व प्रकाशकाने ग्रंथाची एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय पुणे व नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. संबंधित ग्रंथालयास सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती प्राप्त करून ग्रंथालय संचालनालयास ग्रंथांसोबत पोच पावती टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. विहित तारखेनंतर प्राप्त झालेल्या ग्रंथांचा निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही, असेही ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

### पूर्वनियोजित वेळ असलेल्या अर्जदारांसाठी 6 फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादरीकरणाची संधी

पुणे (दैनिक संध्या) : सारथी व वाहन या प्रणालीवर ज्या अर्जदारांनी अनुज्ञप्ती व वाहनांच्या कामकाजासंबंधी 28 जानेवारी 2026 रोजीची पर्वनियोजीत वेळे घेतलेली आहे अशा अर्जदारांनी 6 फेब्रुवारी 2026 पर्यंत कोणत्याही दिवशी  कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आपले अर्ज सादर करावे. अशा अर्जदारांची 28 जानेवारी रोजीची वेळ ग्राह्य धरली जाणार आहे असे प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

### शिल्पा शिंदे ऊर्फ अंगूरी भाबीला कर्जतमध्ये सापडली निरामय शांतता



पुणे (दैनिक संध्या) : पडद्यावर निरागस, मोहक आणि खट्याळ अंगूरी भाबीच्या भूमिकेतून प्रेक्षकांचे मन जिंकणाऱ्या शिल्पा शिंदे यांना खऱ्या आयुष्यात मात्र निसर्गाच्या सान्निध्यात एक वेगळाच आनंद आणि समाधान लाभले आहे. शहराच्या धावपळीपासून आणि गोंगाटापासून दूर, कर्जतमधील स्वतःच्या फार्महाऊसमध्ये त्या आज शांत, प्रसन्न आणि समतोल जीवन जगत आहेत. स्वप्नवत आणि आरामदायी अशी ही जागा शिल्पा यांनी अत्यंत जिव्हाळ्याने उभारली असून, आता ते केवळ फार्महाऊस न राहता त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. येथे त्या शेतीचा मनमुराद आनंद घेत आहेत. स्वतः रोपे लावत आहेत, भाजीपाला पिकवत आहेत, औषधी वनस्पतींची निगा राखत आहेत आणि मातीशी नातं जोडत आहेत. हिरव्यागार वातावरणात सकाळची चाल, ताज्या हवेत श्वास घेणं आणि जमिनीत हात मळवणं. हे सारे क्षण त्यांना अंतर्मुख करणारे ठरत आहेत. आपला अनुभव सांगताना शिल्पा शिंदे म्हणाल्या, “कर्जतमध्ये माझं स्वतःचं फार्महाऊस उभारणं हा माझ्या आयुष्यातील सर्वात समाधानकारक अनुभव आहे. शहराच्या गडबडीपासून दूर, शांत आणि प्रसन्न वातावरणात राहावं, अशी माझी इच्छा होती. हळूहळू मी शेतीकडे वळले. काही भाज्या आणि औषधी वनस्पती लावल्या, दररोज रोपांची काळजी घेतली आणि त्यांच्या वाढीचा प्रवास अनुभवला. संयम आणि प्रेमाने रोपं वाढताना पाहणं हे अतिशय समाधान देणारं आहे.” त्या पुढे म्हणाल्या, “निसर्गाच्या सान्निध्यात राहणं, पहाटे उठून ताज्या हवेत फेरफटका मारणं, मातीत काम करणं. या सगळ्यातून मला जी शांतता आणि आनंद मिळतो, तो शहरात कधीच मिळू शकत नाही. शहरात ऊर्जा आणि संधी असतात, पण त्याचबरोबर तणाव आणि गोंगाटही असतो. इथे मात्र जीवन अधिक खरं, अधिक संतुलित आणि प्रसन्न वाटतं.”

# रविवारी पंचम पदवी प्रदान व पुरस्कार वितरण सोहळा

## कै. डॉ. धुंडीराज पाठक गुरुजी स्मृतीदिनानिमित्त विशेष गौरव समारंभ ; शारदा, रत्नमाला पुरस्कारांसह विविध पुरस्कारांचे होणार वितरण

पुणे (दै. संध्या) :

ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र, पुणे यांच्या वतीने पंचम पदवी प्रदान सोहळा व भव्य पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. याच दिवशी वास्तुशास्त्रातील गुरू कै. डॉ. धुंडीराज पाठक गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष श्रद्धांजली व स्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पद्मावती जवळील विणकर सभागृह येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत संपन्न होणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष वेदमूर्ती उमेश कुलकर्णी गुरुजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला संस्थेच्या संपर्कप्रमुख ॲड. श्रुती योगेश पिसे तसेच संस्थेचे हितचिंतक व सल्लागार प्रसाद शामसुंदर शिरोडकर हे उपस्थित होते.

मुख्य पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम सकाळी १० वाजता होणार आहे. या सोहळ्यात वास्तुविशारद, अंक विशारद, वास्तु भूषण, वास्तुरत्न तसेच वैदिक टॅरो रीडर या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. या प्रसंगी वास्तु, ज्योतिष व अध्यात्म क्षेत्रातील अनेक मान्यवर, तज्ज्ञ व अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. या पंचम पदवी प्रदान सोहळ्यांतर्गत महाराष्ट्रासह देश-विदेशातून विविध वयोगटांतील विद्यार्थी व विविध अभ्यासक्रमांतून शिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे १५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.




वेदमूर्ती उमेश कुलकर्णी गुरुजी म्हणाले, या वर्षीचा हा सोहळा विशेष महत्त्वाचा असून तो माझे वास्तुशास्त्रातील गुरू कै. डॉ. धुंडीराज पाठक गुरुजी यांच्या स्मृतिदिनाच्या औचित्याने आयोजित करण्यात येत आहे. त्यांच्या वास्तुशास्त्रातील अमूल्य योगदानाची आठवण म्हणून स्मृतिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी लंडन येथून जितेंद्र ओमप्रकाश भट्टड हे विशेष उपस्थित राहणार असून खास या कार्यक्रमासाठी ते भारतात येणार आहेत. तसेच या भव्य सोहळ्याचे उद्घाटन हैदराबादचे ज्येष्ठ ज्योतिर्विद भाऊसाहेब रंगनाथ कुलकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.

सकाळी १० वाजता विविध प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण रत्नमाला रमेश कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. त्यामध्ये ज्येष्ठ वास्तु अभ्यासक डॉ. दिलीप नेमीचंद नहार यांना रत्नमाला पुरस्कार, ज्येष्ठ वास्तुगुरु नरेंद्र सहस्त्रबुद्धे यांना त्यांच्या उल्लेखनीय लेखनासाठी शारदा पुरस्कार, वीरवाडी (नसरापूर) येथील अम्नाय वाटिका वेद पाठशाळेचे संस्थापक व प्रमुख आचार्य वेदमूर्ती घनपाठी गोपाळ भुजंग जोशी गुरुजी यांना वेद संवर्धन प्रेरणा पुरस्कार, तसेच वेदमूर्ती वैभव कुलकर्णी गुरुजी यांना वेदमार्ग दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. तसेच दुपारच्या सत्रामध्ये ज्येष्ठ ज्योतिर्विद व प्रख्यात ज्योतिष अभ्यासक वि. श. अष्टेकर गुरुजी यांना ज्योतिष रत्नकार गुरु कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

कै. डॉ. धुंडीराज पाठक गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणारे मनोगत, आठवणींचे कथन तसेच श्रद्धांजलीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या शिष्यवर्गाकडून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार असून वास्तुशास्त्र परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वास्तू स्थळी नेऊन प्रात्यक्षिक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात वास्तू डिझाईन व वास्तू परीक्षण करताना प्रत्यक्ष अनुभवाचा मोठा लाभ होणार असून त्यांचे व्यावसायिक कौशल्य अधिक सक्षम होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विद्यार्थी मनोगत, प्रात्यक्षिक वास्तू व्हिजिट तसेच अनुभव कथनाचे सत्र आयोजित करण्यात आले आहे. हा सोहळा दरवर्षी मोठ्या उत्साहात आयोजित केला जात असून, संस्थेच्या विविध अभ्यासक्रमांतून प्रशिक्षित झालेले अनेक विद्यार्थी आज समाजात यशस्वीपणे कार्यरत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## नेतृत्वित उद्योग व कारागिरीला प्रकाशझोतात आणणार

पुणे (दै. संध्या) :

भारतातील आघाडीचा स्वदेशी ई-कॉमर्स मार्केटप्लेस Flipkart यंदाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आपल्या प्रमुख समर्थ विक्री उपक्रमाचा अकरावा अवतार 'क्राफ्टेड बाय भारत २०२६' सादर करत आहे. हा विशेष सेल २६ जानेवारी २०२६ रोजी फ्लिपकार्टच्या ॲप आणि वेबसाइटवर आयोजित करण्यात येणार आहे. या सेलसाठी फ्लिपकार्टवर स्वतंत्र 'क्राफ्टेड बाय भारत' स्टोअरफ्रंट उभारण्यात येणार असून, त्यामध्ये भारताच्या समृद्ध परंपरेचे प्रतीक असलेल्या २०० हून अधिक पारंपरिक कलाप्रकारांचे प्रदर्शन केले जाईल. वारली, पट्टाचित्र, मधुबनी, पिछवाई, टेराकोटा यांसह हातमाग वस्त्रे, लाकडी हस्तकला, मऊ लाकडापासून बनवलेली हाताने घडवलेली खेळणी, प्रादेशिक चित्रकला आणि सजावटीच्या वस्तू यांचा यात समावेश असेल. या माध्यमातून २,३०० हून अधिक कारागीर, विणकर आणि लघुउद्योजक आपली उत्पादने देशभरातील ग्राहकांसमोर मांडणार आहेत. २०१९ मध्ये वंचित समुदायांच्या सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेल्या फ्लिपकार्ट समर्थ या उपक्रमांतर्गत, यंदाच्या 'क्राफ्टेड बाय भारत' एडिशनमध्ये महिला-नेतृत्वित उद्योगांवर विशेष भर देण्यात आला आहे.

## 'झेड'कडून 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स'चे लाँच

■ ब्रँड्सबद्दल प्रेम निर्माण करणारा, मार्केटर्ससाठी नवा मीडिया फॉर्मट

पुणे (दै. संध्या) :

भारतातील अग्रगण्य कंटेंट आणि टेक्नॉलॉजी पॉवरहाउस झी एंटरटेनमेंट एंटरप्राईजेस लिमिटेड (झेड) यांनी आज 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स' या अभिनव मीडिया सोल्यूशनचे अनावरण केले. मल्टी-स्क्रीन एंगेजमेंटच्या युगात सर्जनशील पद्धतीने लक्ष वेधून घेण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे एक ओम्नी-चॅनल मीडिया फॉर्मट असून, ब्रँड्स आणि प्रेक्षकांमध्ये भावनिक नाते निर्माण करण्यावर याचा भर आहे.

भारतीय जाहिरात क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. माध्यमांची उपलब्धता प्रचंड वाढल्यामुळे कोणत्याही आकाराच्या ब्रँडला




सहज जाहिरात करता येत असली, तरी या लोकशाहीकरणातून एक नवे आव्हान निर्माण झाले आहे.

लक्ष देण्याची क्षमता (Attention Span) कमी होत असताना आणि कंटेंटचा मारा वाढत असताना, मार्केटर्ससमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो:

केवळ दिसण्यापासून खऱ्या अर्थाने लक्षात राहण्यापर्यंतचा प्रवास कसा साधायचा?

ब्रँडविषयी जागरूकतेपलीकडे जाऊन, ब्रँडप्रेम आणि कृती कशी निर्माण करायची?

'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स' : कथाकथन, व्यक्तिरेखा आणि व्यावसायिक परिणामांचा संगम

या आव्हानाला उत्तर म्हणून 'झेड'ने सादर केले आहे 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स'. व्यक्तिरेखेला केंद्रस्थानी ठेवणारा, मूमेंट-ड्रिव्हन असा हा नवा मीडिया फॉर्मेट.

पारंपरिक जाहिरातींप्रमाणे ग्राहकांच्या अनुभवात व्यत्यय आणण्याऐवजी, 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स' ब्रँड्सना प्रेक्षकांना आधीपासूनच आवडणाऱ्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या जुळणाऱ्या कथानकांमध्ये नैसर्गिकरीत्या गुंफतो. झेडच्या लोकप्रिय आणि विश्वासार्ह टेलिव्हिजन व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ब्रँड इंटिग्रेशन सहज, प्रामाणिक आणि कथेत मिसळलेले वाटते. जबरदस्तीचे नाही.

## रोहिणी हट्टंगडी – मुक्ता बर्वे पुन्हा एकत्र!

■ 'माया'मध्ये अनुभवायला मिळणार स्वतंत्र स्त्रीमनाचा प्रगल्भ आविष्कार



पुणे (दै. संध्या) :

मराठी रंगभूमीवर माय–लेकीचं नातं अत्यंत संवेदनशीलतेनं मांडणाऱ्या गाजलेल्या 'चारचौघी' या नाटकातून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलेल्या रोहिणी हट्टंगडी आणि मुक्ता बर्वे या दोन दिग्गज अभिनेत्री पुन्हा एकदा एकत्र येत आहेत. यावेळी त्या रंगभूमीवर नव्हे, तर मोठ्या पडद्यावर 'माया' या आगामी मराठी चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहेत.

'चारचौघी'सारख्या स्त्रीप्रधान नाटकानंतर आता 'माया' या चित्रपटातही या दोघी स्वतंत्र विचारांच्या, स्वाभिमानी आणि आत्मभान असलेल्या स्त्री व्यक्तिरेखा साकारणार आहेत. अनुभव आणि अभिनयातील परिपक्वतेचा संगम असलेली ही जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचावणारी ठरत आहे.

रोहिणी हट्टंगडी यांचा अभिनय म्हणजे सूक्ष्मतेतून मोठे भाव उलगडणारी प्रक्रिया, तर मुक्ता बर्वे ही आधुनिक स्त्रीचं सशक्त प्रतिनिधित्व करणारी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. त्यामुळे 'माया' मध्ये त्यांचा केवळ अभिनय नाही तर, स्त्रीमनाच्या विविध छटांची प्रगल्भ मांडणी पाहायला मिळणार आहे.

रोहिणी हट्टंगडी म्हणतात, "मुक्तासोबत पुन्हा काम करणं हा एक अत्यंत समाधान देणारा अनुभव आहे. ती एक संवेदनशील, विचारशील आणि स्वतःच्या अभिनयाबाबत प्रचंड प्रामाणिक अभिनेत्री आहे. तिच्यासोबत काम करताना समोरची व्यक्तिरेखा अधिक सखोल होते. अभिनय म्हणजे केवळ संवाद बोलणं नसून, तो जगण्याचा अनुभव असतो आणि मुक्ताकडे तो अनुभव मनापासून स्वीकारण्याची क्षमता आहे. तिच्यासोबतचा प्रत्येक सीन मला अभिनेत्री म्हणून अधिक समृद्ध करून जातो."

मुक्ता बर्वे आपल्या अनुभवाबद्दल बोलते, "रोहिणी ताईंसोबत पुन्हा काम करणं, ही माझ्यासाठी शिकण्याचीच एक प्रक्रिया आहे. त्यांच्या अनुभवातून येणारी शांतता, प्रसंग समजून घेण्याची दृष्टी आणि अभिनयातील प्रगल्भता सतत प्रेरणा देते. सेटवर त्यांच्यासोबत असताना अभिनय सहज घडतो. त्यांनी आयुष्य आणि अभिनय दोन्ही खूप खोलवर अनुभवलं आहे आणि ते त्यांच्या प्रत्येक भूमिकेत दिसून येतं. अशा कलाकारासोबत काम करणं हे खरं तर भाग्य आहे.”

शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन निर्मित 'माया' या चित्रपटाचे निर्माते डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार आणि नितीन प्रकाश वैद्य आहेत. आदित्य इंगळे दिग्दर्शित या चित्रपटात मुक्ता बर्वे, रोहिणी हट्टंगडी यांच्यासह गिरीश ओक, सिद्धार्थ चांदेकर आणि विजय केंकरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणारा 'माया' हा चित्रपट त्याच्या पोस्टरमुळे आधीच चर्चेत असून, नात्यांच्या गुंत्यातून उमटणारी, स्त्रीमनाच्या स्वातंत्र्याची आणि आत्मशोधाची ही कथा प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच भिडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई? चा दमदार टिकाव!

पुणे (दै. संध्या) :

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?' या चित्रपटाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रदर्शित झाल्यापासूनच या चित्रपटाला चित्रपटगृहात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अनेक शहरांमध्ये व उपनगरांमध्ये शोज हाऊसफुल्ल सुरू आहेत. मोठ्या हिंदी चित्रपटांच्या स्पर्धेतही हा मराठी चित्रपट आपली मजबूत स्थान टिकवून आहे.  सध्या विविध ठिकाणी झालेल्या थिएटर व्हिजिट्सदरम्यान कलाकार व टीमला मिळालेला प्रतिसाद विशेष उल्लेखनीय ठरत आहे. अनेक प्रेक्षक फक्त शीर्षक पाहून हलका-फुलका, मजेशीर चित्रपट पाहाण्याची अपेक्षा घेऊन गेले होते. मात्र, चित्रपट पाहिल्यानंतर हास्याबरोबरच नकळत डोळ्यांत पाणी आणणारे भावनिक क्षण त्यांच्या हृदयाला स्पर्श प्रत्येक डोळ्यांत पाणी आणत आहेत. शो संपल्यानंतर प्रेक्षकांकडून येणाऱ्या सकारात्मक प्रतिक्रिया इतर प्रेक्षकांना चित्रपट पाहाण्यासाठी प्रोत्साहित करत आहे. चित्रपटातील सासू-सूनच्या नात्यातील प्रसंग, संवाद प्रेक्षकांना हसवतानाच



भावनिकही करत आहेत. अनेक प्रेक्षकांना हा चित्रपट आपलासा वाटत असून निर्मिती सावंत व प्रार्थना बेहेरे यांच्या अभिनयाचे भरभरून कौतुक करत आहेत. तसेच प्रेक्षक या चित्रपटासाठी दिग्दर्शक केदार शिंदे यांचे आभार मानत आहेत.  चित्रपटाबद्दलची आणखी विशेष गोष्ट अशी की, काही महिलांनी या चित्रपटाची तिकिटे हळदीकुंकूवाचे वाण म्हणून दिली आहेत. चित्रपटाबरोबरच चित्रपटातील गाण्यांनाही प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. या गाण्यांवर सोशल मीडियावर रील्स शेअर केले जात आहेत. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या घराघरांत पोहोचत असून यामुळे त्यांची नाती अजून घट्ट होत आहेत.

# क्रॉम्प्टनचा जागतिक मानांकनात झेंडा; जगातील क्रमांक एकचा सिलिंग फॅन ब्रँड म्हणून गौरव

पुणे (दै. संध्या) :

भारताच्या अभियांत्रिकी कौशल्याचा आणि नाविन्यपूर्ण उत्पादनांचा जागतिक स्तरावर गौरव करणारी कामगिरी करत, क्रॉम्प्टन या प्रतिष्ठित भारतीय ग्राहक ब्रँडला जगातील पहिल्या क्रमांकाचा सिलिंग फॅन ब्रँड म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. जागतिक आघाडीची स्वतंत्र बाजारसंशोधन संस्था युरोमॉनिटर इंटरनॅशनलने ही मान्यता दिली आहे.

या गौरवामुळे क्रॉम्प्टनचा




समावेश अशा निवडक भारतीय ब्रँड्समध्ये झाला आहे, ज्यांनी केवळ देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही गुणवत्ता, कार्यक्षमता आणि डिझाइनचे नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत.

८५ वर्षांहून अधिक गौरवशाली परंपरेसह क्रॉम्प्टनचा प्रवास भारतीय नाविन्यतेची उत्क्रांती अधोरेखित करतो. लाखो घरांमध्ये विश्वासार्हता निर्माण करत, ब्रँडने कार्यक्षमता, ऊर्जा बचत आणि आधुनिक डिझाइनमध्ये जागतिक दर्जा गाठला आहे. भारतातील अभियांत्रिकी उत्कृष्टता, मजबूत उत्पादन क्षमता आणि ग्राहकांच्या दैनंदिन गरजांची सखोल समज यामुळे क्रॉम्प्टनची जागतिक लोकप्रियता सातत्याने वाढत आहे.

या ऐतिहासिक यशाबद्दल प्रतिक्रिया देताना क्रॉम्प्टनचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रोमीत घोष म्हणाले,

“भारताच्या अनेक पिढ्यांचा विश्वास संपादन केलेल्या क्रॉम्प्टनला जगातील क्रमांक एकचा सिलिंग फॅन ब्रँड म्हणून ओळख मिळणे, हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. या टप्प्यामुळे आमच्या भूतकाळातील वारशासोबतच 'क्रॉम्प्टन २.०' या भविष्याभिमुख प्रवासातील आमची संशोधन, विकास आणि प्रगत तंत्रज्ञानातील गुंतवणूक अधोरेखित होते. 'मेक इन इंडिया'च्या बळकटीसह जागतिक उपस्थिती वाढवण्याचा आमचा निर्धार अधिक दृढ झाला आहे.”

ते पुढे म्हणाले, “एक्स-टेक आणि न्यूक्लिअस हे आमचे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म्स पुढील पिढीच्या फॅन तंत्रज्ञानाला दिशा देत आहेत. भविष्यासाठी सज्ज, लवचिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक डिझाइन तयार करण्यावर आमचा भर असून, क्रॉम्प्टन केवळ बदल स्वीकारत नाही तर संपूर्ण श्रेणीचे भविष्य नव्या उंचीवर नेतो.”

दरवर्षी दोन कोटींहून अधिक पंख्यांची विक्री आणि दर दोन सेकंदाला एक क्रॉम्प्टन पंखा खरेदी होणे, हा ब्रँडवरील ग्राहकांच्या दृढ विश्वासाचा प्रत्यय आहे. २०० हून अधिक तज्ज्ञांची आरअँडडी टीम आणि १०० कोटी रुपयांहून अधिक वार्षिक गुंतवणुकीच्या माध्यमातून क्रॉम्प्टनने अँटी-डस्ट तंत्रज्ञान, एअर ३६०० एअरफ्लो आणि सायलेंटप्रो यांसारखी अत्याधुनिक नवकल्पना सादर केल्या आहेत.

डिझाइन आणि कार्यक्षमतेतील उत्कृष्टतेसाठी क्रॉम्प्टनला आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मान मिळाला असून, सायलेंटप्रो ब्लॉसम स्मार्ट फॅनसाठी गुड डिझाइन अवॉर्ड जपान २०२४, सायलेंटप्रो फ्लुइडो वेव्हसाठी रेड डॉट डिझाइन अवॉर्ड २०२५ आणि जर्मन डिझाइन अवॉर्ड २०२६ प्राप्त झाले आहेत.

क्रॉम्प्टन अर्थपूर्ण नाविन्यतेच्या माध्यमातून दैनंदिन जीवन अधिक सुलभ व आनंददायी बनवण्याच्या उद्देशाशी कटिबद्ध असून, तंत्रज्ञान, विश्वास आणि दूरदृष्टीच्या बळावर जागतिक मंचावर भारताचे अभिमानाने प्रतिनिधित्व करत आहे.

ही मान्यता युरोमॉनिटर इंटरनॅशनलच्या व्यापक आणि सखोल संशोधनावर आधारित असून, २०२४ या कॅलेंडर वर्षातील जागतिक रिटेल युनिट विक्रीच्या आधारे, विविध देशांतील सिलिंग फॅन ब्रँड्सचे मूल्यमापन करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### बेवारस मृतदेह शव वाहिकेत न्या; कचरा गाडीत नेवून विटंबना करु नका

■ नगरसेवक गणेश डोंबे यांची मागणी

जेजुरी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत अनेक जण भिकारी उपजीविका करत आहेत. त्यांच्या मृत्यू नंतर कोणीही नातेवाईक नसल्याने, पोलीस स्टेशन व जेजुरी नगरपरिषदेला या बेवारस मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागतात. अनेकदा हे बेवारस मृतदेह कचरा गाडीत नेले जातात. यामुळे मानवतेला काळीमा लागण्याची घटना घडते. हे बेवारस मृतदेह अत्यंसंस्करासाठी शव वाहिका अथवा रुग्णवाहिकेतून न्यावेत अशी मागणी भाजपचे नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते गणेश डोंबे यांनी केली आहे. जेजुरी येथील कैलास स्मशान भूमीत सामाजिक कार्यकर्ते व नवनिर्वाचित नगरसेवक गेली अनेक वर्षांपासून मृत व्यक्तींवर अंत्यसंस्काराचे काम करीत आहेत. कोरोना काळात गणेश डोंबे यांनी जीवाची पर्वा न करता त्यांनी कोरोना ने मृत झालेल्या व्यक्तींवर अंत्य संस्कार केले आहेत. जेजुरी हे तीर्थक्षेत्र असल्याने अनेक अनोळखी व्यक्ती भिक्षा मागून आपली गुजराण करत असतात. यांची संख्या मोठी आहे. या व्यक्ती मृत झाल्या नंतर जेजुरी पोलीस स्टेशन व जेजुरी नगरपरिषदेला या बेवारस मृतदेहावर अंत्य संस्कार करावे लागतात. या बेवारस मृत व्यक्तींचे कोणीही नातेवाईक नसल्याने अंत्यसंस्काराला कोणीही पुढे येत नाहीत. अनेकदा रस्त्याच्या कडेला,बस स्थानक व आदी परिसरात बेवारस मृतदेह आढळून येतात.असे मृतदेह दफन केले जातात.तर अनेकदा हे मृतदेह स्मशानात कचरा गाडीत नेले जातात.ही बाब मानवतेला काळीमा ठरत आहे,मानवतेचा धर्म म्हणून जेजुरी शहरात मोफत शववाहिका व रुग्णवाहिका सेवा उपलब्ध आहे. या शववाहिकेत हे मृतदेह न्यावेत म्हणजे या बेवारस मृतदेहाची विटंबना होणार नाही.याबाबत आपण जेजुरी पोलीस स्टेशन व जेजुरी नगरपरिषदेत हा प्रश्न उपस्थित करणार असल्याचे नगरसेवक गणेश डोंबे यांनी सांगितले.

### उज्जैनच्या संतांच्या मागणीला मंदिर महासंघाचा जाहीर पाठिंबा !



■ गोमांस खाणारे व मूर्तीपूजा न मानणारे यांना मंदिरात प्रवेशबंदी करा ! - मंदिर महासंघ

पुणे (दैनिक संध्या) : उज्जैन येथील संत आणि हिंदू संघटना यांनी मांडलेल्या भूमिकेचे समर्थन करत मंदिर महासंघाचे समन्वयक श्री. सुनील घनवट यांनी स्पष्ट केले की, हिंदू तीर्थक्षेत्रे ही केवळ पर्यटनाची केंद्रे नसून ती हिंदूंची पवित्र व जागृत आध्यात्मिक क्षेत्रे आहेत. ज्यांचा मूर्तीपूजेवर विश्वास नाही, हिंदू संस्कृती मानत नाही आणि जे गोमांस भक्षण करून हिंदूंच्या धार्मिक भावना पायदळी तुडवतात, अशांना मंदिरात प्रवेश हवाच कशाला? त्यांच्यावर प्रवेशबंदीच हवी, अशी भूमिका मंदिर महासंघाने मांडली. मंदिरांचे सात्त्विक वातावरण टिकवण्यासाठी आणि पावित्र्य भंग होऊ नये, यासाठी अहिंदूंच्या मंदिर व मंदिर परिसरातील प्रवेशावर तात्काळ बंदी घालणे, ही काळाची गरज आहे. या संदर्भात फोंडा, गोवा येथील मंदिर महासंघाच्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेसाठी उपस्थित महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, छत्तीसगड येथील विविध मंदिरांच्या विश्वस्तांच्या उपस्थितीत एकमताने ठराव संमत करण्यात आला, अशी माहिती मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली. हिंदू मंदिरांच्या रक्षणासाठी ही नियमावली लागू झालीच पाहिजे. तीर्थक्षेत्रांच्या परिसरात पावित्र्य नष्ट करणे आणि छुप्या पद्धतीने प्रवेश करणाऱ्या विघातक प्रवृत्तींमुळे हिंदू मंदिरांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, म्हणून आम्ही ही मागणी करत आहोत, असे घनवट यांनी म्हटले आहे.

# बोरिवली न्यायालयात ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ साजरा

**न्यायिक कामकाजात मराठीचा अधिक वापर करण्याचे आवाहन**

मुंबई (दै. संध्या) :

मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारच्या निर्देशानुसार साजऱ्या होणाऱ्या "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" अंतर्गत बोरीवली न्यायालयीन केंद्रात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २३ जानेवारी २०२६ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ६७ वे न्यायालय, बोरिवली यांच्या न्यायालयीन कक्षात हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. बी. एन. चिकणे (२४ वे न्यायालय), न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) श्री. शिवदत्त पाटील (२६ वे न्यायालय), श्री. शिवाजी खलाणे (४३ वे न्यायालय), श्री. ए. एम. मुजावर (१७ वे न्यायालय), आणि श्री. विजय चौगुले (६८ वे न्यायालय) यांसह इतर न्यायिक अधिकारी, कर्मचारी वर्ग, पोलीस अधिकारी, वकील वर्ग तसेच सरकारी अभियोक्ता उपस्थित होते.

न्यायालयीन प्रकरणांमध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या विषयावर सखोल चर्चा झाली. उपस्थित मान्यवरांनी मराठी भाषेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाची सुरुवात बोरिवली बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गिरी यांनी केली. ॲड.एम. के. गिरी, ॲड. राहुल आव्हाड, ॲड.अनिल जगताप, आणि ॲड. वर्षा केकाने यांनी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्त भाषणे केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. ए.एम. मुजावर यांनी मराठी भाषेचे महत्त्व सर्वांना पटवून दिले. न्यायालयीन दैनंदिन कामकाजात मराठीचा सक्रिय वापर व्हावा, यासाठी त्यांनी सर्वांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले आणि ठाम आवाहन केले. कार्यक्रमाच्या समारोपात बोरीवली बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गिरी यांनी सर्व सहभागींचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



या उपक्रमामुळे न्यायालयीन यंत्रणेत मराठी भाषेचा वापर वाढवण्याची दिशा अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. राज्यभरातील विविध न्यायालयांमध्ये आणि शासकीय कार्यालयांमध्ये असेच कार्यक्रम राबवले जात असून, मराठी भाषेच्या अभिमान आणि वापराला चालना मिळावी, हीच या पंधरवड्याची मुख्य संकल्पना आहे.

## काँग्रेसचा विचार तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी ‘प्रतिभा शोध’ अभियानात भाग घ्या : हरी शंकर गुप्ता

मुंबई (दै. संध्या) :

काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करण्याच्या अनुषंगाने काँग्रेसचा विचार, इतिहासाची माहिती असणारे, लोकशाही व संविधानवादी लोकांना एक व्यासपीठ देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाने सुरु केला आहे. राज्यातील सर्व स्तरातील लोकांना यात सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न असून त्यासाठी प्रतिभा शोध अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन दिल्लीचे माजी आमदार व या अभियानाचे महाराष्ट्र प्रभारी हरी शंकर गुप्ता यांनी केले आहे. प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत प्रतिभा शोध अभियानाची माहिती देताना हरी शंकर गुप्ता पुढे म्हणाले की, जिल्ह्या जिल्ह्यात विविध विषयाची उत्तम ज्ञान असलेले अनेक लोक आहेत, त्यांना काँग्रेस पक्षाशी जोडण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. यात निवड झालेल्यांना संशोधन विश्लेषक, प्रवक्ते तसेच काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागात काम करण्याची संधी देण्यात येईल. तीन टप्प्यात हा कार्यक्रम होणार असून या अभियासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करायचे आहेत, त्यानंतर त्या अर्जांची छाननी केली जाईल. काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पत्रकार, इतिहास तज्ञ यांसह विविध क्षेत्रातील तज्ञ यांची समिती छाननी झालेल्यांची मुलाखत घेतील व त्यातून अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अंतिम निवड करेल. देशभरात हे अभियान सुरु असून उत्तर प्रदेशातून ५५० जणांनी यासाठी नाव नोंदणी केली आहे तर जम्मू काश्मीर मधून १०० लोकांनी नोंदणी केली आहे. झारखंड, ओडीशा या राज्यातूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे, असेही हरि शंकर गुप्ता म्हणाले.. यावेळी प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते सुरेश राजहंस उपस्थित होते. यावेळी वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, राजकारणात येण्याची अनेकांची इच्छा असते पण मार्ग नसतो, समाजातील प्रतिभासंपन्न लोकांच्या प्रतिभेला चालना देण्याचा काँग्रेस पक्ष प्रयत्न करत आहे. हा एक पारदर्शक कार्यक्रम आहे.

## पोलिस निरीक्षकांच्या बदल्या; वरिष्ठ पदांवर सहा अधिकाऱ्यांची नेमणूक

पुणे (दै. संध्या) :

पुणे शहर पोलिस दलातील २५ पोलिस निरीक्षकांच्या प्रशासकीय कारणास्तव अंतर्गत बदल्या करण्याचा आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. त्यामध्ये सहा पोलिस निरीक्षकांकडे पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकपदाची जबाबदारी सोपविली आहे. तसेच, तीन सहाय्यक आयुक्तांसह गुन्हे शाखेतील पोलिस निरीक्षकांच्याही युनिटअंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत.

पोलिस निरीक्षकांची नावे (सध्याची नेमणूक आणि बदली झालेले ठिकाण) जयंत राजूरकर (सहकारनगर पोलिस ठाणे ते वरिष्ठ पोलिस निरीक्षक समर्थ पोलिस ठाणे), राघवेंद्रसिंह क्षीरसागर (पोलिस निरीक्षक, कल्याण शाखा ते उत्तमनगर पोलिस ठाणे), विनय पाटणकर (नियंत्रण कक्ष ते वरिष्ठ निरीक्षक, सिंहगड रस्ता), मारुती पाटील (वाहतूक शाखा ते वरिष्ठ निरीक्षक येवलेवाडी), संतोष खेतमाळस (आर्थिक गुन्हे शाखा ते लष्कर), नंदकुमार गायकवाड (पर्वती ते वाघोली पोलिस ठाणे), मनीषा पाटील (मार्केट यार्ड ते लोहगाव पोलिस ठाणे), विश्वजीत जगताप (लोहगाव ते मार्केट यार्ड पोलिस ठाणे), राजेंद्र सहाणे (वाहतूक शाखा ते वरिष्ठ निरीक्षक, पर्वती), महेश बोळकोटगी (शिवाजीनगर ते वारजे माळवाडी पोलिस ठाणे).

## प्रशासकीय प्रवासाचा प्रेरणादायी दस्तऐवज; मोहन ठोंबरे यांच्या पुस्तकांचे दिमाखात प्रकाशन

पिंपरी (दै. संध्या) :

७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पुण्यात एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याच्या सेवेत तीन दशकांहून अधिक काळ कार्यरत राहिलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी मोहन ठोंबरे (भा.प्र.से. निवृत्त) यांच्या ‘A Promise to Myself’ (इंग्रजी) आणि ‘एक वचन : स्वतःला दिलेले’ (मराठी) या दोन पुस्तकांचे प्रकाशन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर थिएटरमध्ये मोठ्या उत्साहात पार पडले.

महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव जयंतकुमार बनठिया (भा.प्र.से. निवृत्त) आणि महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते या पुस्तकांचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यास प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. दौलत देसाई व सुनील पाटील (माजी सनदी अधिकारी), मंदार पाटील (संचालक, पुढारी वृत्तपत्र), पूनम मेहता व सतीश राऊत (अतिरिक्त जिल्हाधिकारी) उपस्थित होते.



मोहन ठोंबरे यांनी उपजिल्हाधिकारी पदापासून भारतीय प्रशासकीय सेवेपर्यंतच्या प्रवासात अनेक संवेदनशील जबाबदाऱ्या पेलल्या आहेत. हे पुस्तक केवळ त्यांच्या आठवणींचा संग्रह नसून, शासनव्यवस्थेकडे 'मानवी मूल्यांवर आधारलेली जबाबदारी' म्हणून पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन आहे. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात निर्णय घेताना येणाऱ्या अडचणी. प्रशासकीय चौकटीत काम करताना येणारी आव्हाने आणि त्यातून काढलेले मार्ग. जनतेच्या अपेक्षा आणि सरकारी यंत्रणा यांचा साधलेला समतोल.

"हे पुस्तक केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठीच नव्हे, तर स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या आणि सामाजिक कार्यात रस असलेल्या तरुण पिढीसाठी एक दीपस्तंभ ठरेल," असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. ही दोन्ही पुस्तके ए.पी.के. पब्लिशर्स एल.एल.पी., पुणे यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आली आहेत. एका अनुभवी अधिकाऱ्याचा हा जीवनप्रवास प्रशासकीय कार्यपद्धती समजून घेणाऱ्यांसाठी मोलाचा ठेवा ठरणार आहे.

## ज्ञानवर्धिनी विद्यालयाचे नाट्य वाचन स्पर्धेत यश



चाकण (दै. संध्या) :

कलापिनी व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कै. बाळासाहेब गद्रे स्मृती नाट्य वाचन स्पर्धेत येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन घवघवीत यश संपादन केले. पहिल्या विभागात " गड आला पण सिंह गेला " या नाटकात साक्षी शिवाजी गुरव या विद्यार्थिनीला वाचन अभिनयात उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. दुसऱ्या विभागात " काही झाले तरी थांबायचे नाही " या नाटकाला सांघिक तृतीय क्रमांक मिळाला. या नाटकात लताबाईंचे पात्र करणाऱ्या स्वरा गणेश रेपाळे या विद्यार्थिनीला उत्कृष्ट अभिनया बद्दल तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्रणित गिरासे, स्वरा रेपाळे, रेवा वाबळे, हिमांशू साबळे, सुदर्शन चौंडे, स्वरा पाटील, जकोजी जाधव यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. उर्मिला कोबल यांनी नाट्य लेखन, तर अर्चना माळी यांनी दिग्दर्शन केले. नितिन शिंदे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे आदींनी सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.

## स्व. महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

पुणे (दै. संध्या) :

स्व. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला व पुतळ्यास पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी पुष्पहार अर्पण केला. उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दोन मिनिटांचे मौन पाळून श्रद्धांजली वाहिली.



याप्रसंगी बोलताना अरविंद शिंदे म्हणाले, “१९४२ साली महात्मा गांधींनी दिलेल्या ‘इंग्रजांनो चले जाव’ या घोषणेने संपूर्ण देश पेटून उठला. या आंदोलनात युवक, विद्यार्थी, तरुणांसह महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांसोबत महिलांनाही तुरुंगवास भोगावा लागला. पुण्यातील आगाखान पॅलेस येथे गांधीजी आणि कस्तुरबा गांधी यांचे दीर्घकाळ वास्तव्य होते. तेथे असताना गांधीजींनी इंग्रज सरकारशी सातत्याने पत्रव्यवहार करत ‘भारत सोडा, स्वातंत्र्य द्या’ ही मागणी लावून धरली. अखेर १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. नंतर नौखाली येथे उसळलेल्या दंगलीदरम्यान स्वतः गांधीजींनी तेथे जाऊन शांतता प्रस्थापित करण्याचे महान कार्य केले. अशा या महान मानवतावादी नेत्याला मी शतशः प्रणाम करतो.” या श्रद्धांजली कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे खजिनदार ॲड. अभय छाजेड, माजी आमदार दीप्ती चवधरी, प्रवक्ते गोपाळ तिवारी, अजित दरेकर, प्राची दुधाने, द. स. पोळेकर, नवनिर्वाचित नगरसेवक रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम, प्रशांत जगताप, रफिक शेख, अविनाश साळवी, सायरा शेख, अश्विनी लांडगे, विशाल मलके, दिपाली डोख, सुमय्या नदाफ, वैशाली भालेराव, साहिल केदारी, तस्लीम शेख, आसिया शेख, काशिफ सय्यद यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जेजुरी नगरपरिषद, ता. पुरंदर, जि. पुणे.**
**जाहिर निविदा नोटीस**

जा. क्र. - जेनपा/कावि/१८२/२०२६ — दिनांक:- ३०/०१/२०२६

जेजुरी नगरपरिषदेस नगरपरिषद निधितुन नगरपरिषदेने खालील प्रमाणे नोंदणी केलेल्या ठेकेदार यांचेकडुन द्वि-लिफाफा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम रू. | कोरे दरपत्रक फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | जेजुरी नगरपरिषद विद्युत विभागास आवश्यकतेनुसार LED बल्ब व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे. | ५०००/- | १०००/- |

**नियम व अटी**
- निविदा सादर करावयाचा दि. ३१/०१/२०२६ पासून ते दि. ०८/०२/२०२६ पर्यंत राहील.
- सदर निविदा फार्म नगरपरिषद कार्यालयात मिळतील.

सही/-
मुख्याधिकारी,
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
**निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, भोसरी विभागाअंतर्गत लघुदाब, उच्चदाब वाहिन्यांच्या व रोहित्राचे ब्रेकडाऊन देखभाल व दुरूस्ती तसेच नविन वीज जोडणी कामासाठी एक वर्षाच्या करारासाठी स्थानिक परवानाधारक विद्युत ठेकेदारांची महावितरण कंपनीच्या ई-निविदा नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी http://works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

| Tender No. | Particular | Sale period |
|---|---|---|
| EE/BSR/T-21/2025-2026 | DTC Breakdown | 01.02.2026 to 15.02.2026 |
| EE/BSR/T-22/2025-2026 | LT Breakdown | 01.02.2026 to 15.02.2026 |
| EE/BSR/T-23/2025-2026 | HT Breakdown | 01.02.2026 to 15.02.2026 |
| EE/BSR/T-24/2025-2026 | NSC | 01.02.2026 to 15.02.2026 |

निविदेच्या आवृत्तीत/शुध्दीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केला जाईल.

PRO No-PZ/209/2025-26
कार्यकारी अभियंता
महावितरण, भोसरी विभाग

## श्री मारुती मंदिरा समोरील उंच सुबाभळीचे झाड चारचाकीवर कोसळले

**विजेचे ही शॉर्ट सर्किट : कवठे येमाईत उमेदवार मात्र थोडक्यात बचावले**

कवठे येमाई (दै. संध्या) :

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील श्री मारुती मंदिरा समोर असलेले सुबाभळीचे उंच झाड आज दुपारी दोनच्या दरम्यान वारा नसताना अचानक कोसळले. जवळच उभ्या असलेल्या प्रा. शेटे पत्रकार यांच्या बोलेरो गाडीवरच हे झाड कोसळल्याने गाडीच्या छताचे मोठे नुकसान झाले. दरम्यान मतदारांच्या गाठीभेटी घेण्यासाठी आलेले टाकळी हाजी -कवठे जिल्हा परिषद गटातील भाजपाचे उमेदवार राजेंद्र गावडे हे त्याच ठिकाणी फोनवर बोलत होते. समवेत कवठे गणाच्या भाजपच्या उमेदवार कांचनताई सांडभोर यांचे पती राजेश सांडभोर व सहकारी ही त्याच परिसरात होते. दरम्यान पत्रकार सुभाष शेटे यांनी गावडे यांना आवाज दिल्याने ते ओट्यावर भेट घेत असतानाच अचानक कडकडाट होऊन ते झाड थेट चारचाकीवर कोसळले तर राजेंद्र सांडभोर व सहकारी श्री मारुतीचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गेल्याने सर्वच जण थोडक्यात बचावले. दैव बलवत्तर म्हणून आलेले विघ्न गाडीवर झाड कोसळल्याने दूर झाल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.



एकंदरीत कधी काय होईल याची पुसटशी कल्पना देखील कोणाला नसते.त्या ठिकाणी चारचाकी उभी नसती तर मोठ्या अपघाताची घटना घडण्याची शक्यता ही नाकारता येत नाही. दरम्यान झाड कोसळताना विजेच्या तारांवर ही फांद्या पडल्याने मोठे शॉर्टसर्किट झाले पण लगेचच ते थांबले.हे सुबाभळीचे पडलेले झाड तात्काळ तोडून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला.



**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे- ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२१७६५
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- integratedpune.ee@mahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ८२ सन २०२५-२०२६**

**कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

वरील निविदा सुचनेत समाविष्ठ असुन या निविदा सुचनेची संपुर्ण माहिती खालिल संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in

सही/-
(अनुराधा रा. भंडारे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे-४११००१.

विमाका/पुणे/जाहि./२९६/२०२५-२६


# थोडक्यात पण महत्वाचे...



## वडीलधारी अजितदादा गेले... आर. आर. आबांच्या कन्येचा कंठ दाटला

पिंपरी (दैनिक संध्या) : आर.आर. आबांच्या पश्चात पाटील कुटुंबासाठी आधारवड ठरलेले ज्येष्ठ नेते अजितदादा यांच्या निधनाने कुटुंबावर पुन्हा एकदा मोठा आघात झाला आहे. अजितदादा यांच्या जाण्याने आमच्या आयुष्यात भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली असून हे दुःख पचवणे अत्यंत कठीण आहे, अशा शब्दांत आर. आर. आबांच्या कन्या स्मिता पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आर. आर. आबा यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी अजितदादांनी स्वीकारली होती. आबांच्या पश्चात त्यांचे पुत्र रोहित पाटील आणि कन्या स्मिता पाटील यांच्या पालकत्वाची भूमिका अजितदादांनी निभावली. रोहित पाटील यांच्या राजकीय प्रवासात तसेच स्मिता पाटील यांच्या शैक्षणिक आणि वैवाहिक आयुष्याच्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये अजितदादांची भूमिका मोलाची ठरली. "आबा गेल्यानंतर निर्माण झालेली पोकळी अजितदादांनी भरून काढली होती. ते आमच्यासाठी वडिलांसारखेच होते. पण आता तेही सोडून गेले आहेत. यापुढे त्यांचे मार्गदर्शन, आपुलकी आणि आधार मिळणार नाही, ही जाणीव अजूनही मन स्वीकारत नाही," असे सांगताना स्मिता पाटील यांचा कंठ दाटून आला. आधी आर.आर.आबा आणि आता वडीलधारी अजितदादा यांच्या निधनामुळे पाटील कुटुंबावर दुहेरी दुःख कोसळले असून, या दुःखद प्रसंगी स्मिता पाटील यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत अश्रूंनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## आळंदीत लॉजमध्ये सुरु असलेल्या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश



आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी येथील एका लॉजमध्ये आर्थिक फायद्यासाठी महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या मॅनेजरला पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई मंगळवारी (दि.२७) रात्री योगीराज चौकातील योगीराज लॉजवर करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलिस हवालदार उदयकुमार भोसले यांनी दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी किशोर प्रताप इंगळे (४२, चिखली, पुणे) याला अटक केली आहे. आरोपी लॉजचा मॅनेजर असून, तो एका महिलेला पैशांचे आमिष दाखवून तिच्याकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेत होता. या व्यवसायातून मिळणाऱ्या पैशांवर तो स्वतःची उपजीविका भागवत होता. पोलिसांनी छापा टाकून एका पीडित महिलेची सुटका केली आहे. तसेच, लॉज मॅनेजरला अटक केली आहे.

## चिंचवडमध्ये 15 लाखांचे मेफेड्रोन जप्त; तिघांना अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : अंमली पदार्थ विरोधी पथकाने चिंचवड परिसरात मोठी कारवाई करत १५ लाख १२ हजार रुपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) जप्त केले आहे. ही कारवाई मंगळवारी (दि.२७) रात्री बिजलीनगर चौक परिसरात करण्यात आली. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल गोविंद डोके यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी किशना सैतानराम देवासी (२५, बिजलीनगर), मेकाराम ऊर्फ शाम नारायणराम देवासी (२६, बिजलीनगर) आणि पुरण चौथाराम देवासी (२४, कात्रज, पुणे) यांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिजलीनगर परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी काही जण येणार असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे १४२ ग्रॅम २३० मिली ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ सापडले. अधिक चौकशीत हा माल त्यांनी कात्रज येथील पुरण देवासी याच्याकडून विक्रीसाठी आणल्याचे समोर आले. पोलिसांनी अंमली पदार्थासह एक दुचाकी आणि दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. चिंचवड पोलीस तपास करीत आहेत.

## रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ५०.७० लाखांचा अपहार

पिंपरी (दै. संध्या) :

- १५ कर्मचाऱ्यांवर कारवाई
- भाडे व अनामत रक्कम वसुलीत गंभीर गैरप्रकार; महापालिकेच्या आर्थिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या भाडे व अनामत (डिपॉझिट) रक्कम वसुलीत तब्बल 50 लाख 70 हजार 626 रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात महापालिकेच्या क्रीडा विभागातील 15 कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. प्रेक्षागृह भाड्याने देताना अनामत रक्कम न घेणे, जमा झालेल्या भाड्याची परस्पर विल्हेवाट लावणे, कार्यक्रमांची नोंद न ठेवणे, तसेच, साहित्य व साधनसामग्रीचे आर्थिक नुकसान केल्याचा ठपका संबंधित कर्मचाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणामुळे महापालिकेतील आर्थिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.


महापालिकेची शहरात पाच नाट्यगृहे व प्रेक्षागृहे आहेत. त्यामध्ये चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे सभागृह, भोसरीतील अंकुशराव लांडगे नाट्यगृह, नवी सांगवीतील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह आणि निगडी-प्राधिकरणमधील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह यांचा समावेश आहे. खासगी सभागृहांच्या तुलनेत दर वाजवी असल्याने या ठिकाणी व्यावसायिक नाटके, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक तसेच, खासगी कार्यक्रमांची मोठी वर्दळ असते. मात्र, चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सन 2018 ते 2023-24 या कालावधीत कार्यक्रमांचा हिशेबच ठेवण्यात आला नसल्याचे तपासणीत उघड झाले. या काळात लिपिक, मुख्य लिपिक, व्यवस्थापक म्हणून काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जमा झालेल्या रकमेची महापालिकेच्या तिजोरीत भर न करता ती थेट स्वतःच्या खिशात घातल्याचा संशय आहे. क्रीडा विभागाने हा अहवाल पुढील चौकशी व कारवाईसाठी प्रशासन विभागाकडे पाठविला आहे.

सुरुवातीला सुमारे 20 लाख रुपयांच्या अपहाराचा संशय होता. मात्र, तपासात हा आकडा वाढत गेला. या प्रकरणात लिपिक, मुख्य लिपिक, व्यवस्थापक, प्रशासन अधिकारी यांचीही चौकशी सुरू आहे. त्यानुसार 42 लाख 68 हजार 215 रुपये वसूलपात्र आणि 8 लाख 3 हजार 411 रुपये आक्षेपाधीन ठेवण्यात आले आहेत.

# अजितदादांच्या स्मरणार्थ अजित सृष्टी उभारणार!

**भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाला सूचना**









पिंपरी (दै. संध्या) :

> "महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत प्रत्येक टप्प्यावर अजितदादा पवार यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व लाभले. त्यांच्या कार्याची आणि विचारांची जपणूक होणे ही केवळ भावना नाही, तर आम्हा पिंपरी-चिंचवडकरांची जबाबदारी आहे. नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात उभारण्यात येणारे स्मारक, सभागृहाला दिले जाणारे त्यांचे नाव आणि 'अजित सृष्टी' ही संकल्पना भविष्यातील पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देईल. याबाबत महापालिका प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. त्यासाठी आम्ही सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत.
>
> **— महेश लांडगे, आमदार, पिंपरी-चिंचवड.**

महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे लोकनेते, दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवड नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डिकर यांना सविस्तर निवेदन दिले आहे.

चिंचवड येथील डी-मार्टसमोरील 33.86 एकर जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय संकुलात सुमारे 8.65 एकर क्षेत्रावर मुख्य इमारतीचे काम सुरू असून, भविष्यात महापालिकेचे संपूर्ण प्रशासकीय कामकाज याच ठिकाणाहून चालणार आहे. या पार्श्वभूमीवर, या इमारतीच्या आवारातच दिवंगत अजितदादांचा पूर्णाकृती ब्रॉंझ पुतळा असलेले स्मारक उभारण्यात येणार आहे.

आमदार लांडगे यांनी नमूद केले आहे की, दिवंगत अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या सर्वांगीन विकासाला गती दिली. पायाभूत सुविधा, नागरी सेवा, प्रशासकीय निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख धोरणांमुळे राज्याला वेगळी ओळख मिळाली. असे नेतृत्व अकाली काळाच्या पडद्याआड जाणे ही महाराष्ट्राची मोठी हानी असून, त्यांच्या कार्याची जपणूक होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे नवनिर्वाचित नगरसेवकांच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत अजितदादांच्या स्मारकाचा प्रस्ताव मंजूर करून पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी, यासाठी आम्ही आग्रही आहोत. तत्पूर्वी जुन्या महापालिका सभागृहात अजितदादांचे तैलचित्र तातडीने बसवण्यात यावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.

नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहाला 'अजितदादा पवार सभागृह' असे नाव देण्यात यावे आणि शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा विकास प्रवास, तसेच भविष्यातील नियोजन अधोरेखित करणारी 'पिंपरी-चिंचवड अजित सृष्टी' उभारण्यात यावी,अशी संकल्पना आहे. शहराला विकासामध्ये एक नंबर बनवण्याचे स्वप्न अजितदादांनी पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. हे स्मारक भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे ठरेल आणि हिच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा विश्वास आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

## आरटीई शाळा नोंदणीला अल्प प्रतिसाद; २९६ पैकी फक्त १५६ शाळांची नोंद

पिंपरी (दै. संध्या) :

- मुदतवाढ देऊनही खासगी शाळांचा निरुत्साह, आरटीई प्रवेश प्रक्रियेवर परिणाम





शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी शाळा नोंदणी प्रक्रिया 9 जानेवारीपासून सुरू झाली आहे. दुसऱ्यांदा मुदतवाढ देवूनही 296 शाळांपैकी फक्त 156 शाळांनीच आरटीईसाठी नोंदणी केली आहे.

शहरातील खासगी शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव 25 टक्के जागांवरील प्रवेशप्रक्रिया लागू असणाऱ्या शाळांची नोंदणीकडे पाठ असल्याचे चित्र दिसत आहे. यामध्ये आकुर्डी विभागातून आरटीईअंतर्गत येणाऱ्या 177 पैकी 97 शाळांनी नोंदणी केली आहे.

तर, पिंपरी विभागामधून 119 पैकी 59 शाळांनी नोंदणी केली आहे. शाळा नोंदणी झाल्यानंतर प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येणार आहेत. मात्र, दुसऱ्यांदा मुदतवाढ देवूनही नोंदणीला शाळांचा कमी प्रतिसाद लाभला आहे. दरवर्षी पहिल्या टप्प्यामध्ये कधीच शाळांची नोंदणी होत नाही. त्यामुळे यंदाही शाळा नोंदणीस मुदतवाढ देण्याची शक्यता आहे. आरटीईअंतर्गत शहरातील शाळांची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर सर्व शाळांचे मॅपिंग होईल. त्यानंतर आरटीईतून प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मागवून घेतले जातील. विद्यार्थ्यांना शाळांचा प्राधान्यक्रम द्यावा लागेल आणि त्यानुसार त्यांना संबंधित शाळांमध्ये प्रवेश मिळतील.

दरवर्षी दिलेल्या मुदतीमध्ये शाळा कधीच नोंदणी करत नाही. त्यामुळे प्रत्येक वेळी मुदतवाढ दिल्याने आरटीई प्रवेशाचे वेळापत्रक विस्कळीत होते. शाळा नोंदणी पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. नोंदणीसाठी अजूनही काही शाळांकडून निरूत्साह असल्याचे स्पष्ट होत आहे. आरटीई प्रवेशित विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून वेळेत मिळत नसल्याच्या कारणावरून काही शाळा नोंदणीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते आहे.

## नांगरगावात वीज खांब कोसळल्याने वीजपुरवठा खंडित

लोणावळा (दै. संध्या) :

लोणावळा शहरातील नांगरगाव येथे लाईटच्या खांबांना अज्ञात वाहनाची जोरदार धडक बसल्यामुळे श्री स्वामी समर्थ जनकल्याण केंद्रासमोरील चार खांब पडले आहेत. त्यामुळे या सर्व भागातील वीजपुरवठा मध्यरात्रीपासून खंडित झाला आहे. अपघाताची व लाईटचे खांब पडल्याची माहिती लोणावळा वीज वितरण कार्यालयाला समजल्यानंतर त्यांनी तात्काळ आपले कर्मचारी घटनास्थळी पाठवत या भागातील वीजपुरवठा बंद केला व रस्त्यावर पडलेले खांब व लाईटच्या तारा बाजूला करत रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला. खांब पडल्यामुळे नांगरगाव व वलवन या परिसरामधील काही भागाचा वीजपुरवठा खंडित झाला असून, उर्वरित ठिकाणी दुसऱ्या ठिकाणाहून वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरातील खंडित झालेला वीजपुरवठा सुरू करण्यासाठी वीज वितरण कार्यालयाकडून अतिरिक्त कामगारांची टीम बोलवत दुपारपर्यंत सर्व खांब उभे करण्यात आले. त्यानंतर, या सर्व कामांवरील तुटलेल्या तारा नवीन बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## देहूरोड शासकीय रुग्णालयातील सोनोग्राफी सेवा बंद

देहूरोड (दै. संध्या) :

देहूरोड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन मागील तीन महिन्यांपासून डॉक्टर नसल्यामुळे बंद असल्याने रुग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. अल्पदरात उपलब्ध असलेली सोनोग्राफी सेवा बंद असल्यामुळे गोरगरीब व मध्यमवर्गीय रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे जावे लागत असून, त्यांना आर्थिक, मानसिक तसेच वेळेचा त्रास सह करावा लागत आहे. या रुग्णालयात गर्भवती महिला, अपघातग्रस्त रुग्ण, पोटदुखी, किडनी स्टोन तसेच विविध आजारांच्या तपासणीसाठी दररोज रुग्ण येतात. शासकीय रुग्णालयात कमी खर्चात सोनोग्राफी होत असल्याने ही सेवा नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची होती. मात्र, मागील तीन महिन्यांपासून मशीन बंद असल्याने रुग्णांना 2 ते 3 हजार रुपये खर्च करून खासगी सोनोग्राफी केंद्रात तपासणी करावी लागत आहे. सोनोग्राफी ही गर्भवती महिलांसाठी अत्यावश्यक तपासणी असून, वेळेवर तपासणी न झाल्यास माता व गर्भाच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो.

## स्थायी समितीत भाजपचे वर्चस्व; पिंपरी-चिंचवड महापौरपद सोमवारी स्पष्ट

पिंपरी (दै. संध्या) :

- भाजप ११, राष्ट्रवादी ४, शिवसेना १ सदस्य; महापालिकेत सत्तासमीकरण ठळक





नगरसेवकांच्या संख्येनुसार महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या असलेल्या स्थायी समितीमध्ये भाजपचे सर्वाधिक 11, राष्ट्रवादीचे 4 आणि शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) 1 नगरसेवक असणार आहे. महापालिकेत अस्तित्वात असलेल्या तीनही पक्षाला स्थायी समितीचे सदस्यत्व मिळणार आहे. मात्र, नगरसेवक संख्या कमी असल्याने विविध विषय समित्यांमध्ये शिवसेनेच्या नगरसेवकांना संधी मिळणार नाही.

महापालिकेच्या निवडणुकीत 84 नगरसेवक निवडून आल्याने भाजपची एकहाती सत्ता आली आहे. एक अपक्ष नगरसेवक भाजपसोबत आहे. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेसचे 37 आणि शिवसेनेचे 6 नगरसेवक आहेत. असे महापालिकेतील नगरसेवकांचे बलाबल आहे. स्थायी समितीकडून हिरवा कंदील दिल्यानंतरच पालिकेची विकासकामे मार्गी लागतात. पालिकेच्या तिजोरीच्या चाव्या या समितीकडे असतात. त्यामुळे या महत्वाच्या समितीवर वर्णी लागावी म्हणून सर्वच नगरसेवकांचा आग्रह असतो. त्यासाठी पक्षश्रेष्ठींसह स्थानिक लोकप्रतिनिधींकडे त्यासाठी मनधरणी केली जात आहे. विधी समिती, शहर सुधारणा समिती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती, शिक्षण समिती, महिला व बालकल्याण समिती अशा विविध 5 विषय समित्या आहेत. या विषय समितीमध्ये प्रत्येकी 9 नगरसेवक सदस्य असतात. त्या समितीमध्ये भाजपचे 6 आणि राष्ट्रवादीचे 3 नगरसेवक सदस्य असणार आहेत. नगरसेवक संख्या कमी असल्याने शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) नगरसेवकांना त्या समितीमध्ये संधी मिळणार नाही. निवडणुकीत विजयी झालेल्या नगरसेवकांचा पक्षनिहाय स्वतंत्र गट करुन त्यांची पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक असते. शिवसेनेची (एकनाथ शिंदे) नोंदणी झाली असून, गटनेतेपदी विश्वजित बारणे यांची निवड झाली आहे.

# मावळच्या विकासासाठी ५ हजार कोटींचा निधी; दादांनी दिलेला शब्द पूर्ण

## आमदार सुनील शेळकेंच्या माध्यमातून मावळचा चेहरामोहरा बदलणाऱ्या विकासकामांना गती

वडगाव मावळ (दै. संध्या) :



मला फक्त आमदार द्या, तुम्हाला हवा तितका निधी देतो, असे वारंवार आवाहन करत मावळात राष्ट्रवादीचा आमदार करण्याचे स्वप्न पूर्ण झाले आणि मावळच्या विकासासाठी पाच वर्षांत तब्बल 5 हजार कोटींचा निधी देऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेला शब्दही पाळला. आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून मावळ तालुक्यातील विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसह विकासकामांना निधी देऊन मावळचा चेहरामोहरा बदलण्याचे काम दादांनी केले.

मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये सन 1995 मध्ये सत्तांतर झाले. स्व. रूपलेखा ढोरे यांच्या माध्यमातून मावळात भाजपच्या पहिला आमदार झाल्या. तेव्हापासून सन 2019 पर्यंत म्हणजे तब्बल 25 वर्षे मावळ तालुक्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता अबाधित राहिली. दरम्यान, सन 1999 ला राष्ट्रवादी कॉँग्रेसची स्थापना झाली. तेव्हापासून अजित पवार हे मला फक्त पक्षाचा आमदार द्या मी तुम्हाला हवा तितका निधी देतो, असे वारंवार सांगत होते. मावळात राष्ट्रवादीचा आमदार व्हावा हे त्यांचे स्वप्न होते.

अखेर सन 2019 मध्ये सुनील शेळके यांच्या रूपाने मावळात राष्ट्रवादीला आमदार मिळाला आणि दादांचे स्वप्न पूर्ण झाले. त्या पंचवार्षिक काळात पहिली दोन वर्षे कोरोना संकटात गेली. काही काळ विरोधात बसावे लागले. तरीही दादांनी आमदार शेळके यांनी सुचवलेल्या सर्व महत्त्वपूर्ण प्रकल्पांना व विकासकामांना मंजुरी देत जवळपास 5 हजार कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आणि मावळच्या जनतेला दिलेला शब्द पूर्ण केला.

यामध्ये वडगाव मावळ येथील भव्य प्रशासकीय इमारत, पोलिस ठाणे, लोणावळा व कान्हे फाटा येथे दोन उपजिल्हा रुग्णालय, अंदर मावळसाठी सुमारे 40 किलोमीटर अंतर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, वडेश्वर येथील आदिवासी विद्यार्थी आश्रम शाळेची नूतन इमारत, तालुक्यातील सर्व तलाठी कार्यालयांच्या इमारती, जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना अशा असंख्य कामांचा समावेश असून, संबंधित कामे त्यांच्या डोळ्यांदेखत पूर्ण झाली आहेत.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मावळ तालुक्यावर विशेष प्रेम केले. गेल्या सहा वर्षांत सुमारे 5 हजार कोटींचा निधी देऊन मावळ तालुक्याचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम दादांनी केले. त्यामुळे दादांच्या मृत्यूच्या घटनेने संपूर्ण मावळ तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, वडगाव मावळ, तळेगाव दाभाडे, लोणावळा, कामशेत, पवनानगर येथील नागरिकांनी बाजारपेठा बंद ठेवून शोक व्यक्त केला. तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेससह तालुक्यातील भाजपा, शिवसेना, कॉंग्रेस, मनसे, रिपाइं, स्वाभिमानी रिपाइं, वंचित आघाडी अशा सर्वच पक्षांमध्ये शोकाकुल वातावरण पसरले आहे.

दादांनी मंजुरी दिलेल्या प्रमुख कामांमध्ये दोन उपजिल्हा रुग्णालये, प्रशासकीय इमारत, तळेगाव दाभाडे नगर परिषद इमारत, वडगाव पोलिस ठाणे इमारत, आदिवासी आश्रमशाळा आदी कामे त्यांच्या डोळ्यादेखत पूर्ण झाली. परंतु, त्यांनीच मंजुरी दिलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये लोणावळा येथील ग्लास स्काय वॉक प्रकल्प, एकवीरा देवी येथील रोपवे, कुंडमळा येथील पर्यटनदृष्ट्या पुलाची उभारणी, तळेगाव ते चाकण रस्ता, कान्हे फाटा येथील रेल्वे उड्डाणपूल अशी महत्वाची कामे अजून प्रलंबित आहेत. तसेच श्रीक्षेत्र भंडारा डोंगर पायथ्याला संतभूमी कॉरिडॉर उभारण्याचे व तालुक्यासाठी भव्य क्रीडा संकुल उभारण्याचे दादांचे स्वप्न मात्र अधुरे राहिले.

मावळात 25 वर्षे पक्षाचा आमदार नव्हता, तरीही दादांचे मावळ तालुक्यावर विशेष प्रेम होते. तालुक्यातील पक्षाच्या कार्यकर्त्यांवर त्यांचा जीव होता. निवडणूक असो किंवा कोणताही पक्षाचा अथवा खासगी कार्यक्रम असो, दादा मावळात यायचेच. सहा वर्षांपूर्वी आमदार सुनील शेळके यांच्या रूपाने दादांचे स्वप्न पूर्ण झाले. त्यानंतर मात्र दादा मोठ्या अभिमानाने मावळात येत होते. परंतु, 4 जानेवारीला झालेला दादांचा दौरा हा अनोखाच ठरला. ते आमदार शेळके यांनी आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवाला गेल्या सात वर्षांत पहिल्यांदाच आले. आमदार शेळके यांनी दादांना फक्त जेवण करून जावे, अशी विनंती केली. दादांनीही ती मान्य करत उपस्थित असलेल्या माय बहिणींसोबत मांडी घालून जमिनीवर बसून पत्रावळीमध्ये भात, आमटी, शेक भाजी, बुंदी असा महाप्रसादाचा लाभ घेतला आणि हाच त्यांचा मावळ तालुक्यातील शेवटचा पाहुणचार ठरला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तळेगाव ढमढेरेमध्ये कडकडीत बंद; शाळा-कॉलेजला सुट्टी, बाजारपेठा ओस

बारामती (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रासह शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे परिसरात शोककळा पसरली आहे. या धक्कादायक घटनेचे पडसाद उमटत असतानाच ग्रामस्थांनी आणि व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळून आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली. गावातील सर्व बाजारपेठ, लहान-मोठी दुकाने, व्यापारी आस्थापने आणि कृषी उत्पन्न उपबाजार समितीचे कामकाज पूर्णपणे बंद ठेवण्यात आले.तसेच शाळा आणि महाविद्यालयांनाही तात्काळ सुट्टी जाहीर करण्यात आली. या शोकाकुल वातावरणात रस्त्यांवरील नेहमीची वर्दळ कमी झाली असून, ठिकठिकाणी भावपूर्ण श्रद्धांजलीचे फलक लावण्यात आले आहेत. श्रीक्षेत्र टाकळी भिमा येथे युवा नेते राहुल करपे यांनी ग्रामस्थांना एकत्र करून श्रद्धांजली वाहिली. अजित पवार यांनी राज्याच्या आणि विशेषतः शिरूर तालुक्याच्या विकासासाठी घेतलेले निर्णय आणि त्यांचे प्रभावशाली नेतृत्व सदैव स्मरणात राहील, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. प्रशासकीय आणि सामाजिक संघटनांनीही एकत्र येत त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली. महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानिमित्त आज तळेगाव ढमढेरे येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आज सकाळी १० वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. तळेगाव ढमढेरेच्या विकासकामात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे.

### आमदार महेश लांडगे आणि डॉ. बाबा कांबळेंची महत्त्वाची बैठक

बारामती (दैनिक संध्या) : भोसरी मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या निवासस्थानी कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा कांबळे यांनी आज भेट देऊन शहरातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. कष्टकऱ्यांच्या उपजीविकेचे संरक्षण आणि त्यांच्या हक्कांच्या उन्नतीसाठी एकत्रित लढा देण्याचा ठाम संकल्प यावेळी करण्यात आला. नॅशनल ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन ऑफ इंडिया तसेच कष्टकरी जनता आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांनी शहरातील कष्टकऱ्यांच्या समस्या मांडल्या. यामध्ये ऑटो-टॅक्सी चालक व मालकांचे प्रलंबित प्रश्न, टपरी-पथारी-हातगाडी धारक, फळभाजी विक्रेते व फेरीवाल्यांच्या उपजीविकेचा प्रश्न, बांधकाम मजूर, हमाल-माथाडी व साफसफाई कामगारांच्या सुविधा तसेच घरकाम करणाऱ्या महिला व स्वयंपाक करणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजनांचा समावेश होता. आमदार महेश लांडगे यांनी या सर्व प्रश्नांकडे संवेदनशीलतेने लक्ष देत, शहराच्या विकासात कष्टकरी वर्गाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. असंघटित कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन व प्रशासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.कष्टकरी जनतेचा आवाज ऐकणारे नेते आणि त्यांच्या हक्कांसाठी लढणारे कार्यकर्ते एकत्र आले तर समाजात सकारात्मक बदल घडतो, अशी भावना डॉ. बाबा कांबळे यांनी व्यक्त केली. भविष्यात कष्टकरी वर्गाच्या उन्नतीसाठी आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबविण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले.या भेटीमुळे शहरातील कष्टकरी वर्गात आशेचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या मागण्यांना आता राजकीय बळ मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### बारामतीत सत्तेतील मित्रपक्षांत लढत; अर्ज माघारीनंतर चित्र स्पष्ट : भाजपकडून कमबॅक

बारामती (दैनिक संध्या) : बारामती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक रंगत आली असून राष्ट्रवादी व भाजप या निवडणुकीत आमने-सामने आहेत. अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी चित्र स्पष्ट झाले असून नगरपरिषदेतील अनुभव घेतल्यानंतर राष्ट्रवादीच्या विरोधात भाजपाने बारामतीत मोट बांधली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी काही गट व गणातील काही जागेवर निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न झाले. मात्र, तसेच झाले नाही. अखेर सर्व जागांवर निवडणूक लागली. राष्ट्रवादीने बेरजेचे राजकारण करत भाजपाला पंचायत समिती गणातील दोन जागा देऊ केल्या होत्या. मात्र, आज अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी चित्र स्पष्ट झाले. भाजपचे सुपे व शिर्सुफळ गणातील उमेदवार कमळाच्या चिन्हावर लढत असल्याचे स्पष्ट झाले. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगता सभेत स्पष्ट केलं होते. मात्र, भाजप कार्यकर्त्यांनी रणनीती आखत सर्व जागांवर निवडणूक लावली. नीरावागज गट व नीरावागज गण आणि डोर्लेवाडी गणात भाजपला उमेदवार मिळाले नाहीत. नगरपरिषद निवडणुकीत भाजपने सुरुवातीला जोरदार तयार केली. नंतर मात्र भाजपची रणनीती फेल ठरली. शेवटच्या टप्प्यात तर भाजप ढेपाळले होते. त्यामुळे जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाने जोर धरला आहे. वरिष्ठांकडून देखील याबाबत भाजपला ताकद मिळणार असल्याचे बोलले जात आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी गट व गणातील सर्व उमेदवार निवडून आणण्यासाठी विरोधकांना देखील आपलेच करण्याचा प्रयत्न केला. मात्र, भाजपाला दोन जागा देऊ केल्या. सुपे व शिर्सुफळ गणात भाजपाला बाय दिल्याची चर्चा होती. त्या दोन्ही गणात राष्ट्रवादीने उमेदवारी अर्ज दाखल केले नाही. त्या ठिकाणी भाजपच्या उमेदवारांनी अपक्ष लढण्यासाठी प्रयत्न झाले. मात्र, भाजप उमेदवारांनी कमळाच्या चिन्हावर लढणे पसंत केले. गट व गणात राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. तरी देखील भाजपने आखलेल्या रणनीतीमुळे काही ठिकाणच्या लढती चुरशीच्या होणार यात शंका नाही.

### बनावट मद्यनिर्मितीप्रकरणी तिघांना अटक

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यातील बनावट मद्यनिर्मितीच्या फिरत्या कारखान्याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने तीन जणांना अटक केली आहे. विभागाने छापा टाकून कारखान्यातील यंत्रसामग्री, तयार मद्य आदींचा एकूण ८५ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दौंड येथील निरीक्षक विजय रोकडे यांनी याबाबत माहिती दिली. दौंड तालुक्यातील पांढरेवाडी, गार व सोनवडी येथे मंगळवारी (ता. २७) छापे टाकून ही कारवाई करण्यात आली होती. पांढरेवाडी गावातील विजय झगडे याच्या ताब्यातील बनावट विदेशी मद्याचे १४१ बॉक्स, एक ट्रॅक्टर व एक कार जप्त करण्यात आली. सोनवडी गावच्या हद्दीत सुनील नगराळे याच्या ताब्यातून स्वयंचलित यंत्रसामग्री, ३५०० लिटर मद्यार्क, बनावट विदेशी मद्याचे २ बॉक्स, साडेनऊ हजार रिकाम्या बाटल्या, यंत्रसामग्री, १ आयशर कंपनीचा टेम्पो, मोबाइल संच, आदी जप्त करण्यात आले. गार हद्दीत सोमनाथ नांदखिले याने एका वीटभट्टीजवळ जमिनीत पुरून ठेवलेले बनावट देशी मद्याचे ४० बॉक्स जप्त करण्यात आले. त्याचबरोबर बावीस हजार बनावट बाटलीचे बूच, साठ हजार बनावट लेबल, पंधरा हजार रिकाम्या बाटल्या, १ मोबाइल संच, जप्त करण्यात आला.

# “आता रडायचे नाही, लढायचे!”

## माजी आमदार दिलीप मोहिते पाटलांचे कार्यकर्त्यांना भावनिक आवाहन

**बारामती (दै. संध्या)**




> “महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेत दरारा निर्माण करणारे नेतृत्व म्हणून अजितदादांची ओळख होती. सभागृहात आता आपल्या हक्काचा नेता दिसणार नाही याची खंत कायम राहील. केवळ राष्ट्रवादी काँग्रेसलाच नव्हे तर सर्व पक्षीयांना आणि राज्यातील जनतेला अजितदादांची गरज होती. पुणे जिल्ह्याच्या विकासामागे पवार कुटुंबाचा मोठा वाटा आहे.”
> – बाबाजी काळे, आमदार

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने खेड तालुका, पुणे जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्र पोरका झाला आहे. लाखो कार्यकर्त्यांचे भवितव्य अधांतरी राहिले असून दादांची स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी आता आपल्यावर आहे. आता रडायचे नाही, लढायचे आहे. अजित दादांची स्वप्ने साकार करायची आहेत, असे भावनिक आवाहन खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केले.

राजगुरुनगर येथे आम्ही राजगुरुनगरकर यांच्या वतीने आयोजित शोकसभेत ते बोलत होते. यावेळी आमदार बाबाजी काळे, माजी जिल्हा परिषद सदस्या सुरेखा मोहिते, शिवसेना महिला जिल्हा संघटक विजया शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बाबा राक्षे, महिला उपाध्यक्षा कांचन ढमाले, तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, तालुका महिला अध्यक्षा संध्या जाधव, पंस माजी सभापती अंकुश राक्षे, ॲड. मनिषा टाकळकर, सुभाष होले, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, नगरसेवक सागर सातकर, वैभव घुमटकर, मित्रसेन डोंगरे, राहुल आढारी, राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, माजी अध्यक्ष किरण आहेर, विद्यमान उपाध्यक्षा अश्विनी पाचारणे, संचालक विनायक घुमटकर, माजी जिप सदस्या मंगल चांभारे, अजय चव्हाण, बापू चौधरी, रज्जाक शेख, संतोष भांगे, शुभम सोनवणे, सतीश राक्षे, पप्पू टोपे, पूजा थिगळे, माऊली वाफगावकर, रेखा क्षोत्रीय, भाजपच्या दिप्ती कुलकर्णी, किशोर कुमठेकर, मनसेचे नितीन ताठे, ॲड. दीपक थिगळे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.माजी आमदार दिलीप मोहिते पाटील पुढे म्हणाले, अजितदादांचे कार्य सर्वसामान्य माणसासाठी होते. सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी निर्णय घेतले. त्यांच्या निर्णयांमुळे सामान्य माणूस सुखी होत होता.

प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख यांच्यानंतर आता अजितदादांसारखे कर्तृत्ववान नेतृत्व नियतीने वेळेआधी हिरावून घेतले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही.ॲड. मुकुंद आवटे म्हणाले, दादांच्या जाण्याने महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांची विचारशक्ती, वक्तृशीरपणा आणि आकलनक्षमता अलौकिक होती. तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षा संध्या जाधव म्हणाल्या, अंगावर खादी आणि हातावर कामांची यादी असे नेतृत्व पुन्हा होणे अशक्य आहे.

राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे म्हणाले, सर्वसामान्य माणसाला स्वतःहून ओळखणारे अजितदादांसारखे नेतृत्व पुन्हा होणार नाही. त्यांचा प्रगल्भ विचार आज राज्याला नक्कीच कमी पडणार आहे.माजी अध्यक्ष किरण आहेर म्हणाले, अजितदादांनी राजगुरुनगर सहकारी बँकेच्या अडचणी सोडवल्या. सहकार क्षेत्रातून त्यांनी बँकेला मोठी मदत केली. समाजाभिमुख नेता आज आपल्यातून निघून गेला आहे.

शिवसेना महिला जिल्हा संघटक विजया शिंदे म्हणाल्या, पुणे जिल्ह्याला पुढे नेणारा नेता म्हणजे अजितदादा होते. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात पवार कुटुंबाचा मोठा वाटा आहे.तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर म्हणाले, गेली 35 वर्षे दादांच्या सानिध्यात काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी खेड तालुक्याचा चेहरामोहरा बदलला. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून देणे हीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल.

जिल्हा उपाध्यक्ष बाबा राक्षे म्हणाले, दादांच्या निधनाने सह्याद्रीही शोकसागरात बुडाला आहे. आम्ही दादांचे होतो, आहोत आणि राहणार आहोत. त्यांची स्वप्ने साकार करण्याचा निर्धार आम्ही केला आहे. शोकसभेत अनेकजण भावनावश झाले. साश्रू नयनांनी उपस्थितांनी अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली.

## जिल्हा परिषदेत १८, पंचायत समितीत ३७ उमेदवारांनी घेतली माघार

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

खेड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा आज (दि. 27) शेवटचा दिवस होता. या दिवशी जिल्हा परिषदेच्या आठ गटांतून 18 उमेदवारांनी तर पंचायत समितीच्या 16 गणांतून तब्बल 37 उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.

माघारीनंतर आता खेड तालुक्यातील सर्व गट व गणांमधील निवडणूक रिंगणातील चित्र स्पष्ट झाले असून विविध पक्षांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. वाफगाव-रेटवडी गटातील भाजपच्या उमेदवार श्रद्धा सांडभोर, अनुजा नितीन जाधव, मेदनकरवाडी गटातील जनता दलचे मच्छिंद्र उमाप तसेच नाणेकरवाडी-म्हाळुंगे गटातील भाजपचे संदीप सोमवंशी व क्रांती सोमवंशी यांच्यासह 13 अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे. पंचायत समितीच्या गणांमध्येही मोठ्या प्रमाणावर माघारी झाल्या असून रेटवडी गणातून भाजपचे गणेश गुंडाळ, म्हाळुंगे गणातून क्रांती सोमवंशी, आळंदी ग्रामीण गणातून अमोल वीरकर, आंबेठाण गणातून शिवसेनेच्या निर्मला मांडेकर यांच्यासह एकूण 37 उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे.

## अजितदादांच्या आठवणीने हर्षवर्धन पाटील झाले भावूक

**बारामती (दै. संध्या)**



> “छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात केलेले, अजितदादा हे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्याची माहिती असलेल्या मोजक्या नेत्यांपैकी एक होते. जनतेशी व कार्यकर्त्यांशी त्यांची नाळ घट्ट जोडलेली होती. त्यामुळेच त्यांना प्रचंड लोकप्रियता लाभली. राज्यातील शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला तसेच समाजातील सर्वच घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपल्या सत्तेचा सकारात्मक वापर केला.”
> – हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री

राज्याच्या राजकारणात गेली चार दशके अग्रभागी राहिलेले आणि पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान देणारे, अजित पवार यांच्या निधनाने राज्याचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, अशा शब्दात राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली.

अवघ्या आठ-दहा दिवसांपूर्वीच आमची भेट झाली होती, असे सांगताना पाटील भावूक झाले. राज्य मंत्रिमंडळामध्ये जवळपास पंधरा वर्षे आम्ही एकत्र काम केले. ग्रामीण तसेच शहरी भागातील प्रत्येक विषयाची त्यांना सखोल जाण होती. निर्णयक्षमता, प्रशासकीय अनुभव आणि जनतेच्या प्रश्नांची अचूक जाण यामुळे त्यांच्या कामाची तडफ राज्याने नेहमीच अनुभवली. अभ्यासू वृत्तीच्या बळावर त्यांनी विधिमंडळात आपल्या कामाचा ठसा उमटवला.

रोखठोकपणा आणि त्याचबरोबर दिलदार स्वभाव हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. अजितदादांच्या जाण्याने राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विकासाचे स्पष्ट ‘व्हिजन’ त्यांच्याकडे असल्यानेच सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवणाऱ्या अनेक योजना राज्यात साकारल्या. ‘काम करणारा माणूस’ ही त्यांची प्रतिमा जनमानसात कायम राहील. एक सक्षम, कणखर आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व हरपले, ही हानी महाराष्ट्र कधीही भरून काढू शकणार नाही, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## भल्या पहाटे कामाचा धडाका लावणारा विकासपुरुष हरपला!

**कडूस (दै. संध्या)**


कडूसमध्ये अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याच्या पार्श्वभूमीवर, आज (गुरुवार, दि. 29) श्रीक्षेत्र कडूस येथे कडकडीत बंद पाळून आणि शोकसभेचे आयोजन करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी झालेल्या शोकसभेत उपस्थितांनी आपल्या लाडक्या नेत्याच्या आठवणींना उजाळा दिला.माजी सभापती अंकुश राक्षे म्हणाले की, वयाच्या 17 व्या वर्षी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस संघटनेच्या अध्यक्ष पद देऊन मला संधी देऊन माझा राजकीय प्रवास घडवला केवळ पक्षाच्या सध्या कार्यकर्त्यावर विश्वास ठेवून एक पत्रावर विकासकामांना निधी देणारा एकमेव नेता म्हणजे अजितदादा पवार होते. माझ्या सभापतीपदाच्या काळात, विशेषतः करोनाच्या गंभीर संकटात दादांसोबत काम करण्याची संधी मला मिळाली.

पहाटे 5 वाजता स्वतः उपस्थित राहून विकासकामांची पाहणी करणारा, दूरदृष्टी असणारा नेता महाराष्ट्राला लाभलेला हा ‘विकासपुरुष’ पुन्हा होणे नाही. राक्षे पुढे म्हणाले की, दादांच्या अशा अचानक जाण्याने खेड तालुका आणि पुणे जिल्हा पोरका झाला आहे. त्यांच्या निधनामुळे राज्याची पुढील 20-30 वर्षांची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.

आता राष्ट्रवादीच्या ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे की आपल्याला जिल्हा परिषद पंचायत समिती ची सत्ता राष्ट्रवादी या विचाराची आणायची आहे हीच खरी दादांना श्रद्धांजली ठरेल.यावेळी कडूस चास जिल्हा परिषदेच्या उमेदवार वसुधा राक्षे बोलताना म्हणाल्या की, आपल्या पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून दादांनी जिल्ह्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

आज आपल्या सर्वांचा हा आधारवड कोसळला आहे. यावेळी शंकर कावडे, प्रियांका देवदरे, अभिनाथ शेंडे, कांचन धमाले, अनिकेत धायबर यांसह कडूस शहर आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी साश्रू नयनांनी दादांना अखेरचा निरोप दिला.

## हवेली तालुक्यात भाजप-राष्ट्रवादीत काट्याची टक्कर

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी हवेली तालुक्यातील पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या तालुक्यातून 6 जागांसाठी 25 तर हवेली पंचायत समितीच्या 12 जागांसाठी 42 उमेदवार अंतिम रिंगणात आहेत. तालुक्यातील सर्वच मतदारसंघात भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी जिल्हा परिषदेसाठी प्रत्येकी 6 तर पंचायत समितीसाठी प्रत्येकी 12 उमेदवार मैदानात उतरवले आहेत. वंचित बहुजन आघाडीने जिल्हा परिषदेसाठी 2 आणि पंचायत समितीसाठी 1 उमेदवार दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पंचायत समितीची एक जागा लढवत आहे. शिवसेना (शिंदे गट) जिल्हा परिषदेसाठी 3 तर पंचायत समितीसाठी 4 जागांवर, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) जिल्हा परिषदेसाठी 3 आणि पंचायत समितीसाठी 2 जागांवर निवडणूक लढवत आहे. राष्ट्रीय समाज पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना व संभाजी ब्रिगेड पार्टी यांनी पंचायत समितीच्या प्रत्येकी एका जागेवर उमेदवार उभे केले आहेत. उर्वरित जागांवर अपक्ष उमेदवारांनी निवडणूक रंगतदार केली आहे. जिल्हा परिषदेच्या थेऊर व कोरेगाव मुळ गटात प्रत्येकी केवळ दोन उमेदवार असल्याने येथे सरळ लढत होत आहे. तर लोणी काळभोर गटात सर्वाधिक 7 उमेदवार रिंगणात आहेत. पंचायत समितीमध्ये खानापूर गणात सर्वाधिक 5 उमेदवार असून थेऊर व आव्हाळवाडी गणात प्रत्येकी दोन उमेदवार असल्याने येथेही थेट लढत होणार आहे.

## लग्नाआधीच काळाने घातला घाला! रेल्वे अपघातात तरुणाचा मृत्यू; जेऊर परिसरात हळहळ

**बारामती (दै. संध्या)**



पुणे- मिरज रेल्वे मार्गावरील जेऊर फाटा (ता. पुरंदर) परिसरात मंगळवारी (दि. २७) घडलेल्या रेल्वे अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या (दि.२२) रोजी तरूणाचा विवाह होणार होता. संपूर्ण कुटुंब घरात लग्नाची तयारी करीत असताना कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. प्रथमेश कुंडलिक तांबे (वय २५, रा.जेऊर), असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

जेऊर फाट्याजवळ रेल्वेमार्गावर अपघात झाल्याची माहिती नागरिकांना मिळाली. जेऊर येथील माजी उपसरपंच ज्ञानेश्वर धुमाळ यांनी माजी पोलीस पाटील कुंडलिक तांबे यांना त्यांच्या पुतण्याचा रेल्वे अपघातात मृत्यू झाल्याची माहिती दिली. घटनास्थळी पाहणी केली असता प्रथमेश याचा मृतदेह आढळून आला. तत्काळ नीरा पोलिस दुरक्षेत्राला माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच नीरा पोलीस दूरक्षेत्राचे हवालदार संदीप मदने, घनशाम चव्हाण व सहकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. जेजुरी ग्रामीण रुग्णालयात मृतदेह शवविच्छेदन झाल्यानंतर दुपारी उशिरा शोकाकूल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. घटनेची नोंद नीरा पोलिस दूरक्षेत्रात केली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

प्रथमेश तांबे हा उच्चशिक्षित असून त्याने एम. एस्सी. पदवी प्राप्त केली होती. तो लोणंद येथील औद्योगिक वसाहतीमधील एका खासगी कंपनीत नुकताच कायमस्वरूपी नोकरीस लागला होता. नोकरी पक्की झाल्यानंतर त्याचे लग्न ठरले होते. फेब्रुवारी महिन्याच्या २२ तारखेला विवाह असल्याने घरात लग्नाची तयारी सुरू होती. सोमवारी (दि.२६) रात्रपाळी करून तो मंगळवारी (दि.२७) सकाळी घरी आला होता. चहा पिऊन मित्राकडे जाऊन येतो असे सांगून घराबाहेर पडलेला प्रथमेश परत आलाच नाही. त्याऐवजी त्याच्या मृत्यूची बातमी कुटुंबीयांवर कोसळली. लग्नाच्या तयारीत असलेल्या घरावर अचानक काळाने घाला घातल्याने जेऊर गावात हळहळ व्यक्त होत आहे. प्रथमेशच्या पश्चात आई, वडील, लहान भाऊ आहेत. ही घटना केवळ कुटुंबापुरती मर्यादित न राहता, तरुणांच्या सुरक्षा आणि रेल्वे मार्गावरील दक्षतेचा संदेश देणारी ठरली असल्याचे सोमेश्वरचे संचालक अनंता तांबे यांनी सांगितले.

लग्नाच्या तयारीत असलेल्या घरावर अचानक काळाचा डोंगर कोसळला. हातावर मेहंदी, डोळ्यांत स्वप्ने, मनात आनंद सर्व काही क्षणात विस्कटल्यासारखे झाले. काही दिवसांत लग्नाच्या बोहल्यावर चढायचा होता,पण आज त्या घरात शोक पसरला आहे. प्रथमेशच्या जाण्याने संपूर्ण गाव हळहळले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नतमस्तक व्हावे या भावनेतून आज पक्ष कार्यालयात आलो - सुनिल तटकरे

■ डबडबलेल्या डोळ्यांनी सुनील तटकरे यांनी दादांच्या केबिनमध्ये जाऊन अभिवादन केले

मुंबई (दैनिक संध्या) : दादांनी ज्या कार्यालयात पक्षाचे संघटन उभे केले तिथे नतमस्तक व्हावे या भावनेतून आज पक्ष कार्यालयात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना दिली. आज कोणतीही पत्रकार परिषद आयोजित केलेली नाही याचा खुलासा पहिल्यांदा सुनील तटकरे यांनी केला. दादांचा अकाली जाण्याचा धक्का आम्हाला बसला असून या धक्क्यातून आम्ही कुणीही सावरलेलो नाही. अजुनही दादा आमच्यात आहेत ही भावना आमच्या मनात आहे. आज कार्यालयात आलो हे माझ्यासाठी क्लेशकारक आहे. याव्यतिरिक्त मला काही बोलायचे नाही असेही सुनील तटकरे यांनी गहिवरलेल्या स्वरात माध्यमांना सांगितले. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली कारण जनतेच्या मनातील आणि आमच्या मनातील भावना व्यक्त केल्या. दादांनी ज्या पद्धतीने महाराष्ट्र घडवला आज त्यांच्या निधनाने राज्य शोकसागरात आहे. दोन दिवस सर्व मिडियामध्ये दादांचे वेगवेगळे पैलू मांडले आहेत. त्याच शोकाकुल वातावरणात आम्ही आहोत. इतर कुठल्याही विषयावर चर्चा झालेली नाही असेही सुनील तटकरे म्हणाले. आज पक्ष कार्यालयात आल्यावर खासदार सुनील तटकरे यांनी दादांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर दादा पक्ष कार्यालयात ज्या केबिनमध्ये बसून कारभार करत होते तिथे जाऊन डबडबलेल्या डोळ्यांनी अभिवादन केले.



### नीरा येथील सर्वपक्षीय शोकसभेत अजितदादांना श्रद्धांजली

■ ग्रामपंचायतीसमोर भावनिक वातावरणात आठवणींना उजाळा

नीरा (दैनिक संध्या) : राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाल्याने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर पुरंदर तालुक्यातील नीरा येथे ग्रामपंचायतीसमोर शुक्रवारी (दि. ३०) सकाळी दहा वाजता सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत विविध पक्षांतील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अजित पवार यांच्या निधनानंतर बुधवारी (दि. २८) व गुरुवारी (दि. २९) नीरा शहरासह परिसरात सर्व व्यापारी व विविध पक्षांचे कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने एकत्र येत कडकडीत बंद पाळला. त्यानंतर शुक्रवारी सकाळी नीरा शहर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या शोकसभेत पुरंदर पंचायत समितीचे माजी उपसभापती लक्ष्मणराव चव्हाण, पुणे जिल्हा बँकेचे चेअरमन प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपसरपंच राजेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, प्रमोद काकडे, राजेश चव्हाण, विराज काकडे, संदीप धायगुडे, दादा गायकवाड, ॲड. आदेश गिरमे, अतुल म्हस्के, दयानंद चव्हाण, महेश जेधे, अमोल साबळे, बाळासाहेब भोसले, सुरेंद्र जेधे, सुरेश निगडे, पृथ्वीराज निगडे, तनुजा शहा, सुजाता दगडे, नम्रता कामतकर आदींनी आपली भाषणे करत अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला. सर्व वक्त्यांनी अजित पवार यांचे नेतृत्व, विकासाभिमुख भूमिका आणि जनतेशी असलेली नाळ यांचा उल्लेख करत आदरांजली अर्पण केली. यावेळी सरपंच तेजश्री काकडे, सुनील चव्हाण, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, कांचन निगडे, उमेश चव्हाण, योगेंद्र माने, स्वप्निल कांबळे, अलताफ सय्यद, जावेद शेख, सिकंदर शेख, अजित सोनवणे, डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, मोनिका कांबळे, वैजयंती शहा, कल्पना पटेल, मोहिनी भिसे यांच्यासह सर्वच पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण शोकसभा अत्यंत शांत व भावनिक वातावरणात पार पडली.

### केंद्र प्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी 'समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५'चे ३ व ४ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले असून परीक्षेचे प्रवेशपत्र https://www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. ही परीक्षा दोन्ही दिवस तीन सत्रांमध्ये होईल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी १८०० २२२ ३६६/ १८०० १०३ ४५६६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा अथवा https://cgrs.ibps.in या लिंकवर तक्रार नोंदवावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी आवश्यक असलेला लॉगिन आयडी (रजिस्ट्रेशन क्रमांक) आवेदनपत्रावर उपलब्ध आहे. तसेच पासवर्ड हा संबंधित उमेदवाराची आवेदनपत्रावरील जन्मतारीख आहे. याची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे.

### नऱ्हेगाव येथील वस्तीगृह प्रवेशाकरिता अर्ज करण्याचे आवाहन



पुणे (दैनिक संध्या) : सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या नऱ्हे गाव येथील मुलींचे शासकीय वसतिगृहात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांतील प्रवेशासाठी ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑफलाईनपद्धतीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वस्तीगृहात बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत गृहपाल, मुलींचे शासकीय वसतिगृह, ओमकार होम्स, सर्वे नं. १४/४, जे.एस.पी.एम. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वार क्रमांक २ जवळ, भुमकर मळा, नऱ्हेगाव, पुणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक प्रदिप संकपाळ यांनी केले आहे.

# जिओ-बीपीच्या 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचे अनावरण

## अतिरिक्त खर्चाशिवाय दरवर्षी १०० किमी अधिक ड्रायव्हिंगचा लाभ

गोवा (दै. संध्या)

पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री मा. श्री. हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते आज गोवा येथे सुरू असलेल्या इंडिया एनर्जी वीक 2026 दरम्यान जिओ-बीपीच्या क्रांतिकारी 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचे अनावरण करण्यात आले.

रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बीपी यांच्या संयुक्त उपक्रमातील रिलायन्स बीपी मोबिलिटी लिमिटेड (RBML) चा कार्यरत ब्रँड जिओ-बीपी यांनी सादर केलेले हे प्रगत पेट्रोल इंजिनमधील महत्त्वाच्या भागांवर साचलेला चिकट मळ सक्रियपणे स्वच्छ करते. परिणामी इंजिनची कार्यक्षमता पूर्ववत होते, संरक्षण वाढते आणि नियमित पेट्रोलच्या तुलनेत वाहनचालकांना दरवर्षी 100 किमी पर्यंत अधिक अंतर पार करण्याचा लाभ मिळतो — तोही कोणत्याही अतिरिक्त किमतीशिवाय.



बीपीच्या 100 वर्षांहून अधिक जागतिक इंधन संशोधन अनुभवावर आधारित, जिओ-बीपीच्या 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचा विकास आणि प्रमाणीकरण उद्योग-मानक चाचण्या तसेच भारतीय इंजिन परिस्थितीनुसार सानुकूल पद्धती वापरून करण्यात आले आहे.

वास्तविक परिस्थितीत या पेट्रोलची स्वच्छता क्षमता सिद्ध करण्यासाठी कोईम्बतूर येथील टेस्ट ट्रॅकवर एका मोटरसायकलची 4,000 किमीहून अधिक अंतरासाठी चाचणी घेण्यात आली. या चाचणीचे थेट प्रात्यक्षिक इंडिया एनर्जी वीकमध्ये उपस्थित प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आले.

जिओ-बीपीचे अध्यक्ष सार्थक बेहुरिया म्हणाले, "भारतीय वाहनचालकांना सुरळीत इंजिन, जास्त विश्वासार्हता, कमी देखभाल खर्च आणि अधिक मायलेज हवे असते. 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोल हे गाडी चालू असतानाच इंजिन स्वच्छ करते, ज्यामुळे हानिकारक मळाचे दुष्परिणाम कमी होतात. उच्च-कार्यक्षमतेची इंजिन स्वच्छता ही आता एक मानक वैशिष्ट्य बनवून, प्रगत इंधन तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध करणे हे आमचे ध्येय आहे."

**ग्राहकांसाठी ठळक फायदे**

- इंजिनच्या नाजूक भागांवर साचलेला मळ प्रभावीपणे काढून टाकते
- इंजिन अधिक सुरळीत, विश्वासार्ह व दीर्घकाळ स्वच्छ राहण्यास मदत
- भारतीय दुचाकी व चारचाकी वापरकर्त्यांसाठी, अतिरिक्त खर्च न करता दरवर्षी 100 किमी पर्यंत जास्त ड्रायव्हिंग

जिओ-बीपीचे CEO अक्षय वाधवा म्हणाले, "इंडिया एनर्जी वीक 2026 मध्ये आम्ही दोन मोटरसायकल्सचे थेट प्रात्यक्षिक सादर केले आहे—एक 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलवर आणि दुसरी सामान्य पेट्रोलवर. प्रगत बोरोस्कोप इमेजिंगद्वारे स्वच्छतेतील स्पष्ट फरक दिसून येतो. पाच वर्षांच्या संशोधनातून विकसित झालेले हे पेट्रोल इंधन कार्यक्षमता वाढवतेच, शिवाय देखभाल खर्चही कमी करते."

इंडिया एनर्जी वीकमधील आपल्या स्टँडवर जिओ-बीपीने इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सोल्युशन्स, एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (ATF), घरपोच डिझेल सेवा तसेच सध्याच्या व भविष्यासाठी सज्ज विविध वायू इंधनांचा व्यापक पोर्टफोलिओ सादर केला. यामुळे कमी कार्बन उत्सर्जन असलेल्या मोबिलिटी सोल्युशन्सद्वारे भारतीय बाजारात अधिक मूल्य देण्याच्या जिओ-बीपीच्या दृष्टिकोनाला बळकटी मिळते.

## 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' चित्रपटातील खास गाणे

मुंबई (दै. संध्या)

'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' हा आपले आवडले विश्व मोठ्या पडद्यावर घेऊन येण्यासाठी सज्ज होत असताना, चित्रपटाने आता आपल्या कथेला हृदय देणारे खास गाणे — 'मनजोगी' सादर केले आहे. सदैव मधुर आवाजासाठी ओळखले जाणारे सोनू निगम यांनी गायलेले हे रोमँटिक गाणे सौम्य, अंतरंग आणि मनाला शांत करणारे आहे. प्रेमाच्या सर्वात प्रामाणिक आणि निवांत भावनांना पकडणारी ही चाल, चित्रपटातील गोंधळ आणि विनोदामध्ये प्रेक्षकांना एक सुंदर, संगीतमय विराम देते. बॉर्डर 2च्या भावनिक तीव्रतेनंतर, 'मनजोगी'मध्ये सोनू निगम हलक्या-फुलक्या आणि खेळकर सिनेमॅटिक विश्वाला आपला आवाज देताना दिसतात.



गीतकार गुलाम मोहम्मद खावर यांनी लिहिलेले आणि संगीतकार विशाल शेळके यांनी संगीतबद्ध केलेले 'मनजोगी' हे गाणे आपल्या निर्मळ भावनेमुळे आणि भावनिक खोलीमुळे वेगळे ठरते. यातील शब्दांमध्ये एक नैसर्गिक मृदूपणा आहे, तर चालीत मनाला शांत करणारी ऊब आहे — आणि हे सर्व मिळून एक असे रोमँटिक गाणे तयार होते, जे शांतपणे परंतु खोलवर श्रोत्यांच्या मनात बराच वेळ रेंगाळत राहते. झी सिनेमा, संजय कोहली आणि बिनैफर कोहली निर्मित आणि झी स्टुडिओज व संजय कोहली प्रस्तुत 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' या एडिट II निर्मित चित्रपटात शुभांगी अत्रे, विदिशा श्रीवास्तव, आसिफ शेख, रोहिताश्व गौर, रवि किशन, मुकेश तिवारी आणि निरहुआ यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे १५ मार्च रोजी भव्य सामूहिक विवाह सोहळा.

पुणे (दै. संध्या)

■ उपक्रमाचे १३वे वर्ष; ५१ जोडप्यांच्या विवाहाचा संकल्प

सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू कुटुंबांना सहकार्य करणाऱ्या भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारा भव्य सामूहिक विवाह सोहळा यावर्षी रविवार, १५ मार्च २०२६ रोजी संपन्न होणार आहे. ही माहिती फाउंडेशनचे विश्वस्त राजेश अग्रवाल यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी जयकिशन गोयल, सरस्वती गोयल, महावीर रतनलाल गोयल, विनोद अग्रवाल, सीमा अग्रवाल, मनोज अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सध्याच्या काळात वाढत चाललेली सामाजिक व आर्थिक विषमता लक्षात घेता सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज बनली आहे. अशा उपक्रमांमधून खऱ्या अर्थाने मानवसेवा घडते, असे मत राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केले. हा विवाह सोहळा ज्येष्ठ समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येत आहे.




ते पुढे म्हणाले की, आजकाल विवाह समारंभांवरील अवाजवी खर्चामुळे अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडतात. विशेषतः मुलीच्या विवाहाची चिंता पालकांसाठी मोठे ओझे ठरते. अशा परिस्थितीत सामूहिक विवाह सोहळे समाजात एकता, सहकार्य व सामाजिक जबाबदारीचा सकारात्मक संदेश देतात.

या सोहळ्यात विवाहबंधनात अडकणाऱ्या प्रत्येक जोडप्यास अलमारी, पंखा, गादी, चादर, मिक्सर, देवघर (देवहारा) तसेच भांडी संच अशा घरगुती उपयोगाच्या वस्तू भेट स्वरूपात देण्यात येणार आहेत. तसेच वर-वधूस संपूर्ण वस्त्रसामग्री, मंगळसूत्र व आवश्यक वैवाहिक साहित्यही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

हिंदू परंपरेनुसार पार पडणारा हा धार्मिक विवाह सोहळा तीन एकर परिसरात पसरलेल्या भव्य गोयल गार्डनमध्ये, आईमाता मंदिरासमोर, गंगाधाम रोड, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे हे १३वे वर्ष आहे. मागील वर्षी २५ जोडप्यांचे विवाह यशस्वीरीत्या पार पडले होते. गेल्या १२ वर्षांत एकूण २४१ जोडप्यांचे विवाह या सोहळ्याच्या माध्यमातून लावण्यात आले आहेत. यावर्षी ५१ जोडप्यांचे विवाह करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या सामूहिक विवाह सोहळ्यासाठी विवाह नोंदणी पूर्णतः मोफत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, पुणे ग्रामीण, कोल्हापूर तसेच पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व नाशिक विभागातील इच्छुक व गरजू जोडप्यांनी 9049992560 / 9422025049 या क्रमांकांवर संपर्क साधावा.

गोयल कुटुंबाच्या सामाजिक संवेदनशीलतेतून साकारलेला हा उपक्रम गरीब, निराधार व सामान्य समाजघटकांना सन्मानपूर्वक वैवाहिक जीवनाची नवी सुरुवात करण्याची सुवर्णसंधी देईल, असा विश्वास राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केला.

## युजीसीचे इक्विटी नियम सामाजिक न्यायासाठी आवश्यक; स्थगिती दुर्दैवी!

**डॉ. हुलगेश चलवादी यांचे प्रतिपादन**

पुणे (दै. संध्या)

उच्च शिक्षण संस्थांमध्ये धर्म, जात, लिंग आणि सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारे होणारा भेदभाव संपवण्यासाठी युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनने जाहीर केलेले UGC (Promotion of Equity in Higher Education) Regulations 2026 हे ऐतिहासिक आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले धाडसी पाऊल आहे. मात्र या प्रगतशील नियमांना सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे, ही बाब अत्यंत दुर्दैवी असून यामुळे वंचित आणि मागास घटकांतील विद्यार्थ्यांच्या अपेक्षांना तात्पुरता धक्का बसला आहे, असे स्पष्ट मत माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी शुक्रवारी (ता.३०) व्यक्त केले.

देशात संविधान समानतेची हमी देत असताना शिक्षण संस्थांमध्ये आजही भेदभावाच्या घटना घडत आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही. युजीसीचे नवे इक्विटी नियम ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आहे.अशा नियमांना विरोध करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे भेदभाव करणाऱ्या व्यवस्थेला संरक्षण देण्यासारखे आहे,असे डॉ.चलवादी म्हणाले. या नव्या नियमांनुसार प्रत्येक विद्यापीठ व महाविद्यालयात स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे, प्रवेश प्रक्रिया आणि वसतिगृहातील खोली वाटपात पूर्ण पारदर्शकता ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर सरकारी निधी रोखणे व मोठा दंड आकारण्याची तरतूद आहे. "ही तरतूद काहींना जाचक वाटत असली तरी, अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांसाठी तीच संरक्षणाची ढाल आहे," असे डॉ.चलवादी यांनी ठामपणे सांगितले. २०१२ मधील जुने नियम कालबाह्य झाले होते. आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात अधिक कठोर, स्पष्ट आणि प्रभावी कायदेशीर चौकट आवश्यक होती. युजीसीने ती देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र काही शक्तींना समानता नको असल्यामुळे या नियमांविरोधात न्यायालयात आव्हान देण्यात आले, ही बाब चिंताजनक आहे, असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती तात्पुरती असून, न्यायालय संविधानिक मूल्यांची बाजू घेईल आणि अंतिम निर्णयात हे नियम पुन्हा लागू होतील, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला. "शिक्षण क्षेत्रात समान संधी, सुरक्षित वातावरण आणि भयमुक्त कँपस निर्माण करण्यासाठी हे नियम आवश्यक आहेत. सरकारने आणि युजीसीने या नियमांवर ठाम भूमिका घेत न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडली पाहिजे," असे आवाहनही डॉ.चलवादी यांनी केले.

## पेटीएमने सलग तिसऱ्या तिमाहीत कमावला नफा

पुणे (दै. संध्या)

■ निव्वळ नफा ₹२२५ कोटींवर पोहोचला

■ आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत महसूल ₹२,१९४ कोटींवर वाढला

पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड), भारतातील एमएसएमई आणि मोठ्या उद्योगांना सेवा देणारी पूर्ण-स्टॅक व्यापारी पेमेंटमधील अग्रणी कंपनी, आणि एक अग्रगण्य वित्तीय सेवा वितरण कंपनी, तसेच मोबाइल पेमेंट, क्यूआर कोड आणि साउंडबॉक्सची प्रणेती, यांनी आज डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे (तिसरी तिमाही आर्थिक वर्ष २६) आर्थिक निकाल जाहीर केले. मजबूत मुद्रीकरण, उच्च पेमेंट जीएमव्ही, व्यापारी सबस्क्रिप्शन आणि वित्तीय सेवांच्या वितरणातून मिळणाऱ्या महसुलामुळे कंपनीने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा नोंदवला आहे.

डिसेंबर तिमाहीत, पेटीएमने ₹२२५ कोटींचा कर-पश्चात नफा (PAT) नोंदवला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ₹४३३ कोटींनी अधिक आहे. या तिमाहीसाठी ईबीआयटीडीए ₹१५६ कोटींवर पोहोचला असून ईबीआयटीडीए मार्जिन ७% होता, जो महसूल वाढ आणि सततच्या ऑपरेटिंग लिव्हरेजमुळे मागील वर्षाच्या तुलनेत ₹३७९ कोटींची सुधारणा दर्शवतो. कॉन्ट्रिब्युशन नफा ₹१,२४९ कोटी होता.

## किंगकडून आगामी अल्बम 'राजा हिंदुस्तानी'मधील 'जो इश्क हुआ' हे नवे गाणे प्रदर्शित

मुंबई (दै. संध्या)

"मान मेरी जान" आणि "तु जाना ना पिया" सारख्या रोमँटिक हिट गाण्यांनी संपूर्ण पिढीला प्रेमात बुडवणारे पॉप स्टार किंग या लग्नसराईच्या हंगामात "जो इश्क हुआ" या आणखी एका गाण्यासह परत आला आहे. हे गाणे हृदयस्पर्शी असून नात्यांमध्ये उबदारपणा आणते आणि कायमच्या प्रेमाला समर्पित आहे. किंगने भावनिकदृष्ट्या प्रभावी गीतांना आठवणींमध्ये राहणाऱ्या सूरांसोबत मिसळून "जो इश्क हुआ" हे गाणे सादर केले आहे. हे सदाबहार आणि कायमचे प्रेम व्यक्त करणारे प्रेमगीत आहे. हे गाणे अशा नात्यांचा उत्सव साजरा करते जे आपल्याला आपल्या जोडीदाराशी असलेले नातं, त्यातील विश्वास आणि प्रेम व्यक्त करण्यास शिकवतो.

"जो इश्क हुआ" च्या म्युझिक व्हिडिओमध्ये लोकप्रिय अभिनेत्री श्रिया पिळगावकर आहे, जी किंगच्या आगामी अल्बम, राजा हिंदुस्तानीची झलक दाखवते.

जयपूरच्या राजेशाही परिसरात शूट केलेल्या जो इश्क हुआ' या म्युझिक व्हिडिओमध्ये लग्नाच्या थीमवर आधारित कथा दाखवली आहे, जी बालपणातील प्रेमापासून सुरू होऊन आयुष्यभर टिकणाऱ्या नात्यापर्यंत पोहोचते. पारंपरिक हळदी आणि वरमाला समारंभांच्या पार्श्वभूमीवर सेट केलेला हा व्हिडिओ शाळेच्या दिवसातील आठवणी आणि वर्तमानातील लग्नसोहळा एकत्र दाखवतो. गाण्याची सुरुवात हळुवारपणे होऊन ते एका भव्य, सिनेमॅटिक संगीतमय वातावरणात उलगडते.

गाण्याबद्दल बोलताना किंग म्हणाला, "जो इश्क हुआ हे खूप प्रामाणिकपणे तयार केलेले गाणे आहे. हे अशा प्रेमाचे प्रतीक आहे ज्याला घोषणा करण्याची गरज नाही, ते फक्त टिकून राहते. हे गाणं सौम्य, हृदयाला स्पर्श करणाऱ्या क्षणांपासून सुरु होऊन एका भव्य, प्रभावी आवाजात बदलते, जे प्रेमाची उब दाखवते. आम्हाला हे गाणं सिनेमॅटिक पण खासगी वाटावं असे हवे होतं, जे प्रत्येक खास क्षणासाठी योग्य असेल."

अभिनेत्री श्रिया पिळगावकर म्हणाली, "मला नेहमीच किंगचे संगीत आणि त्यांची ऊर्जा आवडते. जयपूरमध्ये, विशेषत: एका राजवाड्यात शूटिंग केल्यामुळे कथेला एक सुंदर कालातीत अनुभव मिळाला. हे गाणं स्वतःमध्ये सौम्य, रोमँटिक आहे आणि त्यात मजबूत भावनिक संबंध आहे. ही एक प्रेमकहाणी आहे जी हळूहळू उलगडते आणि दीर्घकाळ लक्षात राहते. मला वाटते प्रेक्षकांनाही हे खूप आवडेल." "जो इश्क हुआ" हे गाणे या हंगामात सर्वोत्तम लग्नाचे गाणे म्हणून रिलीज होत आहे, जे एक अविस्मरणीय प्रेमकहाणी साजरी करते. हे गाणं आता सर्व प्रमुख स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे...




### माळेगावकरांच्यावतीने अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

माळेगाव (दैनिक संध्या) : समस्त माळेगावकरांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या शोकसभेचे आयोजन माळेगाव नगरपंचायत कार्यालयासमोर करण्यात आले होते.यावेळी अजितदादा यांच्या प्रतिमेला नगराध्यक्ष सुयोग शामराव सातपुते आणि गटनेते जयदीप दिलीपराव तावरे यांनी पुष्पहार अर्पण केला. या वेळी उपस्थित मान्यवर व नागरिकांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सामाजिक,राजकीय व विकासात्मक कार्याचा गौरव केला.राज्याच्या विकासात त्यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख करून त्यांच्या नेतृत्वाबद्दल गौरवोद्गार काढण्यात आले. शोकसभेदरम्यान दोन मिनिटांचे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमात शांत व गंभीर वातावरण होते. उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी अविनाश भोसले,धनवान वदक,अमर लाखे,अशोक सस्ते,बाळासो तावरे सर,रमेश गोफणे,योगेश भोसले,मधुकर वाईकर,युसुफ पठाण,प्रताप सातपुते,बाळासाहेब भोसले,अशोकराव तावरे,रहमान शेख ,रियाज सय्यद,भगवान गोंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली. या शोकसभेला विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन समस्त माळेगावकरांच्या वतीने करण्यात आले होते.




### नामदार अजितदादा पवार यांना फार्मसी महाविद्यालयात श्रद्धांजली

सासवड (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी येथील विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी संस्थेचे अध्यक्ष अजितदादा पवार यांना शोकाकुल वातावरणात श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी दादांच्या कर्तुत्वाचा आढावा घेताना अनेक विद्यार्थ्यांना आपले अश्रू अनावर झाले. बारामती तालुक्यातील विद्यार्थी दादांच्या आठवणीने भावनाविवश झाले. प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी पवार यांच्या कारकिर्दीचा आढावा घेताना राज्याच्या प्रगतीत, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाटचालीत दादांच्या भरीव योगदानाचा उल्लेख केला. उपप्राचार्य डॉ, स्मिता पवार, डॉ वैभव शिळीमकर, विशाखा गायकवाड, डॉ अमोल काळे, विद्या म्हस्के, तानाजी सातव यांच्यासह विद्यार्थ्यांनी यावेळी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली वाहीली.

### टेंभुर्णी-कुर्डूवाडी रोडवर थरार! एसटी आणि कारची समोरासमोर भीषण धडक

चाकण (दैनिक संध्या) : टेंभुर्णी-कुर्डूवाडी रोडवर तांबवे गावच्या हद्दीत वीटभट्टीजवळ भरधाव एसटी बसने कारला समोरासमोर जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. बुधवारी (दि. 28) दुपारी सुमारे 2.45 वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे फलटण व कोळकी परिसरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अनिल जगन्नाथ यादव (वय 50, व्यवसाय – सलून, रा. निमगाव केतकी, ता. इंदापूर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.फिर्यादीतील माहितीनुसार, सुराज्य तालीमचे उस्ताद पैलवान बाळासाहेब महादेव काशिद (वय 57), सनिता बाळासाहेब काशिद (वय 50 दोघे रा. बुवासाहेब नगर, कोळकी, ता. फलटण) तसेच शारदा संभाजी राऊत (वय 65) व मुक्ताबाई कल्याण राऊत (वय 70, दोघी रा. तावशी, ता. इंदापूर) हे सर्वजण माढा येथून टेंभुर्णीकडे मारुती सुझुकी बलेनो (क्र. एमएच 11 सीजी 9066) या कारमधून प्रवास करत होते.

# ‘त्या’ कुटुंबातील आणखी १४ जणांच्या 'जातवैधता' रद्द !

**वेगळ्या शाईने वेगळ्या हस्ताक्षरात 'लू' लिहून फेरबदल करण्यात आले**

भिवंडी (दै. संध्या)

औरंगाबाद महसूल विभागात तहसीलदार म्हणून कार्यरत असलेले दत्ता बळीराम निलावाड व अमरावती विभागात तहसीलदार म्हणून कार्यरत असलेले उत्तम सयाजी निलावाड यांचे अनुसूचित जमातीतील 'मन्नेरवारलू' जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द ठरल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र वित्त आणि लेखा सेवा विभागात सहाय्यक संचालक वर्ग १ पदांवर ५ जानेवारी २०२६ रोजी निवड झालेल्या शिल्पा उत्तम निलावाड या उमेदवाराचे 'मन्नेरवारलू' अनुसूचित जमाती प्रवर्गाचे 'सशर्त जातवैधता' प्रमाणपत्र ९ जानेवारी २०२६ रोजी अवैध ठरविले आहे.

आणखी याच कुटुंबातील तब्बल १४ जणांचे 'जातप्रमाणपत्र व जातवैधता' प्रमाणपत्र रद्द झाल्याची बाब पुढे आली आहे.अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती किनवट यांनी या १४ जणांचे जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र 6 नोव्हेंबर 2026 रोजी रद्द केले आहे. या निर्णयाने राज्यभरात शासनाची फसवणूक करुन, समितीपासून वस्तुस्थिती लपवून अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र मिळविणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे. शिवजीत उत्तम निलावाड याचा 'मन्नेरवारलू' जमातीचा दावा 25 ऑगस्ट 2023 रोजी रद्द ठरला होता. त्याच आदेशात या 14 जणांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द ठरले होते. पण उच्च न्यायालयात प्रकरण गेले होते. आता पुन्हा पुनर्पडताळणी होऊन दुसऱ्यांदा या सर्वांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द ठरले आहे.

पोलीस दक्षता पथकाला कुटुंबातील रक्तनात्याच्या शालेय अभिलेखात जातीच्या नोंदी मुनूरवार, मनूरवाड, मनूरवार अशा आढळून आलेल्या आहेत. जात रकान्यात 'लू' हा शब्द वेगळ्या शाईने वेगळ्या हस्ताक्षरात लिहून फेरबदल करण्यात आले. रक्तनातेवाईकांच्या दावाविरोधी असलेल्या जातीचे पुरावे तत्कालीन समितीपासून लपवून जातवैधता प्रमाणपत्रे मिळविली.

माधव बालाजी निलावाड, भानुदास बळीराम निलावाड, विवेक दिगांबर निलावाड, स्वाती दिगांबर निलावाड, ज्योत्स्ना व्यंकट निलावाड,नागेश व्यंकट निलावाड,मयुरी माधव निलावाड, सुभाष बालाजी निलावाड, मारोती बळीराम निलावाड, व्यंकटी बळीराम निलावाड,स्नेहा व्यंकट निलावाड, सुप्रिया माधव निलावाड, स्वप्निल व्यंकट निलावाड,पंकज मारोती निलावाड यांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द ठरले आहे. आदिवासी विकास विभागाने 24 एप्रिल 1985 रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या सध्या अस्तित्वात असलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीतील अनुसूचित जमाती आणि तत्सम जमाती व त्यांच्या नामसाद्रुश्याचा फायदा घेऊन स्वतःला आदिवासी म्हणविणाऱ्या बिगर आदिवासी गटांच्या जाती जमातीची तुलनादर्शक माहिती देणारे विवरण प्रकाशित करण्यात आले आहे.तरीही राज्यातील बनावट जातप्रमाणपत्रांचा सुळसुळाट थांबला नाही.आदिवासींचे आरक्षण दिवसाढवळ्या लुटल्या जात आहे आणि जात चोरीचे प्रकरण अद्याप पर्यंत सुरू आहेत.



“राज्य पुनर्रचना कायदा 1956 नुसार आंध्रप्रदेशातील औरंगाबाद विभाग हा महाराष्ट्रात (तत्कालीन मुंबई राज्यात) समाविष्ट झाला आहे. महाराष्ट्रातील 'मन्नेरवारलू' या जमातीचा उगम आंध्रप्रदेश मधून झाला असल्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (सुधारणा) कायदा 2002 प्रमाणे आंध्रप्रदेश राज्यातून 'मन्नेरवारलू' जमात वगळली असून त्याऐवजी कोलावार अशी दुरुस्ती करुन सुधारणा केली आहे.त्याच धर्तीवर राज्यातही दुरुस्ती करण्यात यावी. अशी मागणी शासनाकडे 'ट्रायबल फोरमचे' राष्ट्रीय संस्थापक व अध्यक्ष ॲड.प्रमोद घोडाम यांनी वारंवार केली आहे.परंतु अद्यापही शासनाकडे निर्णय प्रलंबित आहे.

## चाकणला शिक्रापूर रस्त्यावर अवजड वाहने पडताहेत बंद




चाकण (दै. संध्या)

रस्त्याच्या दुरावस्थेमुळे चाकण - शिक्रापूर रस्त्यावर अवजड वाहने वारंवार बंद पडत असल्याने नागरिक मरणयातना सहन करत आहेत. रस्ते खराब असल्यामुळे दररोज रस्त्यात वाहने बंद पडून वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्यावर वाहनांची तुफान वर्दळ वाढली असून, वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. दररोज वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागत असल्याने नोकरदारांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या कामांना मंजुरी मिळूनही प्रशासन त्याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप उद्योजक डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी केला आहे. अत्यंत वर्दळीचा असलेला हा रस्ता आता वाहतुकीसाठी कमी पडू लागला आहे. अवजड वाहने, कंटेनर व ट्रक रस्त्यातच बंद पडत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दोन वाहने समोरासमोर आल्यास वाहतूक पूर्णपणे स्थिर होते.

“चाकण शिक्रापूर रस्त्यावरील धोकादायक वळणे काढणे आवश्यक आहे. वाहन चालकांना शिस्त लावल्यास अपघाताचे प्रमाण कमी होईल. रस्त्यालगतचा कचरा, खड्डे दुरुस्त करून नागरिकांच्या सोयीसाठी ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत.”
**- डॉ. दत्तात्रय खांडेभराड, उद्योजक, चाकण**

अनेकवेळा नादुरुस्त वाहने रस्त्यात तासनतास उभी राहत असल्याने शाळकरी विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचणे कठीण झाले आहे. यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी केली आहे. ओव्हरटेकच्या प्रयत्नात या रस्त्यावर अनेकांचे नाहक बळी गेले आहेत. तरी सुद्धा प्रशासन डोळेझाक करत आहेत.

## अजितदादांच्या जाण्याने भोर तालुक्यात सन्नाटा

पुणे (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने भोर तालुक्यात सर्वत्र शोककळा पसरली आहे. भोर शहरासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी आपल्या लाडक्या नेत्याच्या आठवणीने कार्यकर्त्यांना भावना अनावर झाल्या होत्या. अजितदादांच्या निधनाची वार्ता समजताच भोर तालुक्यातील सर्वपक्षीयांनी, सुरू असलेला निवडणूक प्रचार तत्काळ थांबवला.

गुरुवारी (दि. २९) भोर नगरपरिषदेसमोर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, काँग्रेस आणि दोन्ही शिवसेनेच्या कार्यकर्त्यांसह नागरिक मोठ्या संख्येने जमले होते. यावेळी दादांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्र पोरका झाला असून, त्यांच्या निधनामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार सर्वच पक्षांनी रद्द केल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. अजित पवारांच्या निधन वृत्तानंतर भोर तालुक्यात सर्वसामान्य जनतेसह विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते भाऊक झाले. धडाडीने काम करणारा माणूस अचानक गेल्याने नागरिक ढसाढसा रडले. नगरपरिषदेच्या समोर श्रद्धांजली वाहताना नगराध्यक्ष रामचंद्र आवारे, उपनगराध्यक्ष ॲड. जयश्री शिंदे, तालुकाध्यक्ष संतोष घोरपडे,कुणाल धुमाळ आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्नर वन विभागाने शाळा-ग्रामसभांमध्ये सुरू केली ‘ही’ विशेष मोहीम

पुणे (दै. संध्या)

कुकडीचा डावा कालवा, आणे-माळशेज पट्टा, पिंपळगाव जोगा कालवा परिसर आणि पुणे-नाशिक व कल्याण-अहिल्यानगर महामार्गालगतच्या आळेफाटा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर लक्षणीयरीत्या वाढला आहे. जंगलांचा परिसर कमी होणे आणि मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे बिबट्या सुरक्षित आसऱ्याच्या शोधात मानवी वस्तीकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर, बिबट्या-मानव संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाने आधुनिक तंत्रज्ञान आणि जनजागृतीचा प्रभावी मार्ग अवलंबला आहे.वन विभागाने शाळा, ग्रामसभा आणि शेतकरी गटांमध्ये बिबट्या अभ्यासक विद्या अत्रेय यांचा माहितीपट दाखवण्यास सुरुवात केली आहे. बिबट्या मुळात क्रूर नसून तो केवळ स्वसंरक्षणासाठी हल्ला करतो, हे यातून पटवून दिले जात आहे. तसेच, जुन्नर उपवनसंरक्षक कार्यालयांतर्गत विशेष प्रशिक्षित लेपर्ड रेस्क्यू टीम सज्ज करण्यात आली आहे.या टीमकडे अत्याधुनिक पिंजरे, ट्रँक्विलायझर गन आणि सुसज्ज रेस्क्यू व्हॅन उपलब्ध असून, जुन्नर, आंबेगाव, राजगुरूनगर आणि शिरूर या चार तालुक्यांसाठी ही टीम अहोरात्र कार्यरत आहे.बिबट्या आढळल्यास गर्दी न करता वन विभागाला तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे. शेत परिसर स्वच्छ ठेवणे, रात्री एकटे न फिरणे आणि संयम राखणे या त्रिसूत्रीचा वापर केल्यास बिबट्याचा त्रास कमी होऊ शकतो.

## मेदनकरवाडी काळुस गटात फक्त प्रचार पत्रकांचे वाटप

चाकण (दै. संध्या)

■ डॉ. दत्तात्रय खांडेभराड

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी अवघे सात दिवस शिल्लक असताना जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. खेड तालुक्यातील मेदनकरवाडी काळुस या जिल्हा परिषदेच्या गटात उमेदवारांकडून कोपरा सभा, प्रचार फेऱ्या तसेच मतदारांच्या घरोघरी जाऊन भेटीगाठी घेतल्या जात होत्या. मात्र बुधवारी राज्याच्या राजकारणाला मोठा धक्का देणारी घटना घडली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र शोककळा पसरली. त्या पार्श्वभूमीवर दुखवटा म्हणून वाजत गाजत सुरू असणारा प्रचार थांबवून मतदारांना केवळ प्रचार पत्रकांचे वाटप केले जात असल्याची माहिती भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष व उद्योजक डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी दिली. राज्य सरकारने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानिमित्त तीन दिवस दुखावटा जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तसेच निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी प्रचार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. कोणत्याही प्रचार सभा किंवा रोड शो घेण्यात येणार नाहीत. मतदारांना केवळ घर टू घर जाऊन प्रचार पत्रकांचे वाटप केले जाणार असून दुखवट्यानंतरच पुन्हा प्रचार सुरू करण्यात येईल, असे भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष व उद्योजक डॉ. दत्तात्रय खांडेभराड व कडाचीवाडीच्या उपसरपंच रूपालीताई खांडेभराड यांनी सांगितले. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारासाठी बाहेर पडलेल्या सर्व पक्षीय उमेदवारांच्या प्रचार गाड्यांना सध्या दोन दिवसांपासून ब्रेक लागला आहे. चाकण, मेदनकरवाडी, काळुस, वाकी, रासे या भागात सध्या तरी उमेदवार अत्यंत शांततेत प्रचार पत्रकांचे वाटप करून विजयी करण्यासाठी मतदारांना साद घालत आहेत. गल्लीबोळातून आणि रस्त्यावर फिरणाऱ्या प्रचाराच्या गाड्या एका जाग्यावर थबकल्याने परिसरात निरव शांतता पसरली आहे. मतांचा धो धो पाऊस झेलून गुलाल आम्हीच उधळणार, असे डॉ. दत्तात्रय खांडेभराड हे सांगत आहेत.



# अजित पवारांनंतर पिंपरी-चिंचवडचे सूत्रे कुणाकडे?

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्व, गटनेता आणि भविष्यातील समीकरणांवर चर्चा रंगात**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहर हा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जात होता. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाल्याने आता शहराची सूत्रे कोणाच्या हातात जाणार?, याची चर्चा राजकीय वर्तुळात निर्माण झाली आहे. पवार कुटुंबातील कोणाकडे पिंपरी-चिंचवडची जबाबदारी दिली जाते की, खासदार, आमदार किंवा स्थानिक नेत्याकडे जबाबदारी सोपवली जाते, याबाबत वेगवेगळे तर्क लढवले जात आहेत.

शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच भाजपचा कट्टर वैरी होता. राज्यातील समीकरणे बदलल्याने विरोधात असलेली राष्ट्रवादी महायुतीत भाजपसोबत एकत्र झाली. अशी स्थिती असली तरी शहरातील पदाधिकाऱ्यांचे कधी मनोमिलन झाल्याचे दिसून आले नाही. राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते भाजपपासून दोन हात दूरच राहण्याचा प्रयत्न करतात. महापालिकेतील आयुक्त तसेच, अधिकारी फारशी दखल घेत नसल्याने तसेच, प्रभागातील कामे होत नसल्याने नगरसेवक व पदाधिकारी अस्वस्थ होते. पक्षात फारसा उत्साह नव्हता.

नऊ वर्षांनी झालेली महापालिका निवडणूक अजित पवारांनी स्वत: ताब्यात घेतली. महापालिकेतील भ्रष्टाचार तसेच, गैरव्यवहार बाहेर काढत, भाजपच्या स्थानिक नेतृत्वावर थेट आरोपाच्या फेऱ्या झाडल्या. प्रचारात त्यांनी तोच मुद्दा प्रकाशझोतात ठेवला. मात्र, त्या लढाईत अजित पवारांना शहरातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी साथ दिली नसल्याचे प्रकर्षाने दिसून आले. नातेगोते, गावकी-भावकी, नातेसंबंध तसेच, व्यावसायिक संबंध सांभाळत कोणी भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर थेट आरोप करण्याची हिंमत दाखवली नाही. पक्षातील अनेक दिग्गज व अनुभवी माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिल्याने तसेच, पक्षसंघटन मजबूत नसतानाही अजितदादांना मोठी उभारी दिली. अजितदादांनी आक्रमक भूमिका घेत संपूर्ण शहर पिंजून काढले. त्यामुळे अनेक उमेदवारांना चांगलेच स्फुरण मिळाले आणि राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा थेट सामना रंगला.

आता, अजितदादा हयात नसल्याने शहराची जबाबदारी कोणाच्या खांद्यावर पडणार याची चर्चा होत आहे. अजितदादांसारखा कणखर नेता शहरात नाही. त्यामुळे कोणाच्या गळ्यात नेतृत्वाची माळ पडणार त्याबाबत तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. दुसरीकडे, पवार कुटुंबांतील सदस्याकडे पिंपरी-चिंचवडची जबाबदारी दिली जाईल, असेही राजकीय जाणकारांकडून सांगितले जात आहे. त्यात अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार, खासदार अमोल कोल्हे यांची नावे समोर येत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे एकूण 37 नगरसेवक निवडून आले आहेत. त्या नगरसेवकांचा गटनेता निवडणीची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. गटनेता हा महापालिका विरोधी पक्षनेता असणार आहे. त्यामुळे त्या पदाला महत्व आहे. तसेच, स्थायी समितीमध्ये 16 पैकी राष्ट्रवादीच्या 4 नगरसेवकांना सदस्य म्हणून संधी मिळणार आहे. तसेच, शिक्षण, विधी, शहर सुधारणा, महिला व बालकल्याण, क्रीडा या विषय समित्यांमध्ये राष्ट्रवादीचे प्रत्येकी 3 नगरसेवकांना सदस्य म्हणून संधी मिळणार आहे. तसेच, महापालिकेत पक्षाचे तीन स्वीकृत नगरसेवक असणार आहेत. त्याचीही निवड करणे आवश्यक आहे. त्यासाठी पक्षश्रेष्ठींना निर्णय घ्यावा लागणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले होते. अजित पवारांसह युवा नेते रोहित पवार व खासदार अमोल कोल्हे यांनी शहरात एकत्रित प्रचार केला. महापालिका निवडणुकीत दोन्ही पक्ष एकत्र आल्याने तसेच, अजित पवार हयात नसल्याने आता, दोन्ही पक्ष कायमचे एकत्र होतील, अशी चर्चा शहरात सुरू आहे. पक्षांची विभागलेली ताकद एकत्र येईल. त्याचा फायदा पक्ष संघटनेला होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यामुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांची पक्षाला साथ मिळू शकते.



महापालिकेतील पक्षाच्या गटनेत्याची निवड केली जाईल. त्यावर लवकरच पक्षश्रेष्ठींकडून निर्णय घेतला जाईल. पिंपरी-चिंचवड शहराचे नेतृत्व कोणाकडे दिले जाईल, याबाबत आताच बोलणे योग्य ठरणार नाही. योग्य वेळी त्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल. **- विलास लांडे, माजी आमदार**

अजितदादा यांचे आकस्मित निधन झाले आहे. आता, पिंपरी-चिंचवड शहराचे नेतृत्व कोण करणार, हे त्यांचे कुटुंबीय ठरवतील. मी पक्षाचा शहराध्यक्ष या नात्याने स्थानिक पातळीवर निर्णय घेऊ शकतो. पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांचा गटनेता निवडणुकीची प्रक्रिया वहिनी सुनेत्रा पवार तसेच, प्रदेशाध्यक्षांशी चर्चा करून घेतला जाईल.
**- योगेश बहल, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

पिंपरी-चिंचवड शहराचे नेतृत्व कोणाकडे द्यायचे, यांचा निर्णय पवार कुटुंबीय घेतील. एकत्र बसून त्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल. त्यासंदर्भात आम्ही बोलणे योग्य नाही. महापालिकेच्या गटनेत्याबाबतही निर्णय घेतला जाईल. त्याची कागदोपत्री सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
**- भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेस**